

श्रेयस अय्यर भारतीय संघात खेळण्यासाठी फिट (पान ७ वर)

दैनिक

# दिव्य वतन

जनसामान्यांचा बुलंद आवाज

नागपूर, अमरावती, चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, वर्धा, यवतमाळ, अकोला, वाशीम, बुलडाणा, नांदेड, हिंगोली, परभणी, लातूर, धाराशिव, अहिल्यानगर, छ. संभाजीनगर, बीड, जालना, नंदुरबार, धुळे, नाशिक



भाजप आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादीत वाद! (पान ८ वर)

RNI Number MAHBIL/२५/A०७८१ E-mail : divyawatan@gmail.com गुरुवार दिनांक ८ जानेवारी २०२६ अंक : १५५ वा वर्ष : २ रे, मूल्य : ३ रुपये, पृष्ठे : ८

## महत्त्वाचे...

### अंबरनाथ अन् अकोटमधील युतीबाबत भाजपला विचारा..



नाशिक- दौऱ्यावर असलेल्या खासदार श्रीकांत शिंदे यांनी काळाराम मंदिराचे दर्शन घेऊन महानगरपालिका निवडणुकीच्या प्रचाराचा शंखनाद केला. यावेळी त्यांनी अंबरनाथ आणि अकोटमधील भाजपच्या 'अजब' युतीवर आपली भूमिका स्पष्ट करत भाजपलाच घरचा आहेर दिला आहे. अकोटमध्ये एमआयएम आणि अंबरनाथमध्ये काँग्रेससोबत भाजपने युती का केली? याचे उत्तर भाजपचे नेतेच अधिक विस्तृतपणे देऊ शकतील. तो त्यांचा प्रश्न आहे. आमचा काँग्रेसला विरोध होता, आहे आणि पुढेही तीव्र राहील, असे श्रीकांत शिंदे म्हणाले. एका बाजूला भाजप देशभर काँग्रेसविरोधी आक्रमक भूमिका घेत असल्याचे चित्र आहे, तर दुसऱ्या बाजूला स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये सत्ता मिळवण्यासाठी विरोधी विचारधारांच्या पक्षांशी थेट हातमिळवणी केली जात असल्याचे समोर आले. अंबरनामध्ये भाजपने शिवसेना शिंदे गटासोबत सत्ता स्थापन करणे अपेक्षित होते. पण भाजपने शिवसेना शिंदे गटाला बाजूला ठेवून काँग्रेससोबत हातमिळवणी केली. तर अकोला जिल्ह्यातील अकोटमध्ये एमआयएमशी आघाडी केली आहे. या घडामोडींमुळे पार्टी विथ डिफरन्स, अशी स्वतःची ओळख सांगणाऱ्या भाजपने सत्तेसाठी आपल्या राजकीय तत्त्वांनाच मुरड घातली आहे का? असा सवाल पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

### काँग्रसचा जाहीरनामा थेट अंबाबाई चरणी



कोल्हापूर - महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसने आपला महत्त्वाकांक्षी जाहीरनामा प्रसिद्ध करत शहराच्या सर्वांगीण विकासाचा रोडमॅप मांडला आहे. महिलांपासून विद्यार्थ्यांपर्यंत, पायाभूत सुविधांपासून पर्यावरण संरक्षणापर्यंत अनेक मुद्द्यांचा समावेश असलेल्या या जाहीरनाम्यामुळे महापालिका निवडणुकीतील राजकीय वातावरण तापण्याची चिन्हं दिसत आहेत. कोल्हापूरचे खासदार शाहू छत्रपती महाराज, काँग्रेस नेते आमदार सतेज पाटील, आमदार जयंत आसगावकर आणि माजी आमदार ऋतुराज पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत हा जाहीरनामा अधिकृतपणे सादर करण्यात आला. विशेष म्हणजे, काँग्रेसच्या सर्व नगरसेवकांनी आणि उमेदवारांनी करवीर निवासिनी अंबाबाई देवीचे दर्शन घेत जाहीरनामा विधिवत पूजा करून अंबाबाई चरणी अर्पण केला.या वेळी उपस्थित नेत्यांनी जाहीरनाम्याला धार्मिक आणि सांस्कृतिक अधिष्ठान देत कोल्हापूरकरांच्या भावना लक्षात घेण्याचा प्रयत्न केला. शाहू छत्रपती महाराज आणि आमदार सतेज पाटील यांनी अंबाबाईच्या चरणी जाहीरनामा अर्पण करत शहराच्या प्रगतीसाठी आशीर्वाद मागितले. काँग्रेसचे सर्व उमेदवार आणि पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

# बदलापुरात एमआयडीसी मधील कंपनीत ८ ते १० स्फोट

## अग्निशामक दलाच्या १० गाड्या घटनास्थळी दाखल

दिव्य वतन /वृत्तसेवा

ठाणे : राज्यभरात महापालिका निवडणुकांचा धुराळा सुरु आहे. राज्यातील 29 मोठ्या शहारांमध्ये महापालिकांची धामधूम सुरु आहे. विशेष म्हणजे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे आज निवडणुकांच्या प्रचाराच्या निमित्ताने ठाणे जिल्ह्यात आहेत. पण मुख्यमंत्री ठाणे जिल्ह्याच्या दौऱ्यावर असतानाच ठाण्यातील एक अनपेक्षित घटना समोर येत आहे.

ठाण्यातील बदलापूर शहरात एक दुखद आणि दुर्दैवी घटना समोर येत आहे. बदलापूरमध्ये एका कंपनीत मोठे स्फोट झाले आहेत. या स्फोटामुळे परिसरात अत्यंत भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे. सध्या घटनास्थळी पोलीस, पालिका प्रशासन, जिल्हा प्रशासन अग्निशामक दलाचे जवान घटानस्थळी दाखल झाले आहेत. परिस्थितीवर सध्या नियंत्रण मिळवण्याचे प्रयत्न सुरु आहेत.

बदलापूरच्या खरवई एमआयडीसीमध्ये एका कंपनीत मोठे स्फोट झाले आहेत. बदलापूर शहरात आज रात्री नऊच्या सुमारास जनजीवन सुरळीत सुरु होतं. सकाळी ऑफिसला गेलेले नागरिक घरी परतले होते. तर अनेक जण रात्रीची शिफ्ट करण्यासाठी कामावर जात होते. प्रत्येक जण आपापल्या कामात व्यवस्त होतं. कुणी आपापल्या घरी आपापल्या कामात बिझी होतं. काही जण घरात टीव्ही पाहत होते. काही जण घरात जेवण करत होते. अनेक जण विश्रांती घेत होते.

कुणी झोपलं होतं. रात्रीची वेळ असल्याने शहर आता शांततेकडे झुकत होतं. पण असं असताना अचानक मोठे स्फोट झाले. या स्फोटाने संपूर्ण शहर हादरलं आहे.

खरवई एमआयडीसी परिसरात पॅसिफिक केमिकल कंपनी आहे. याच कंपनीत आज मोठं संकट ओढावलं आहे. कंपनीत शॉर्ट सर्किट झाल्याची प्राथमिक माहिती आहे. या शॉर्ट सर्किटनंतर कंपनीत मोठमोठे स्फोट झाले. या स्फोटाच्या आवाजाने जमीन मोठ्या प्रमाणात हादरली. परिसरातील नागरीक भयभीत होऊन नेमकं काय झालं? हे पाहण्यासाठी बाहेर आले. विशेष म्हणजे स्फोटांची मालिका ही सुरुच होती. यावेळी तब्बल 8 ते 10 मोठे स्फोट झाल्याची माहिती आहे.

पॅसिफिक कंपनीतील स्फोटानंतर कंपनीत मोठी आग लागली. आगीचे धग इतके मोठे आहेत की, आजूबाजूच्या कंपन्यांनाही मोठा धोका निर्माण होण्याची भीती आहे. घटनेचं गांभीर्य ओळखून अग्निशामक दलाच्या 8 ते 10 गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या आहेत. अग्निशामक दलाकडून आगीवर नियंत्रण



मिळवण्याचे प्रयत्न सुरु आहेत. परिसरात धुराचे मोठे लोट हवेत मिसळताना दिसत आहेत. पोलिसांनी सुरक्षेच्या कारणास्तव संबंधित परिसर पूर्णपणे खाली केला आहे. या घटनेत जीवितहानी झालीय का? ते अद्याप समजू शकलेलं नाही.

## नाशिकमध्ये प्रचारातून राडा : पैसे न मिळाल्याने महिलांत तुफान मारामारी, रोजंदारी बुडाल्याचा आरोप

दिव्य वतन /वृत्तसेवा

मुंबई-प्रचारासाठी महिलांना रोजंदारी देऊन विविध भागांत रॅली तसेच दौऱ्यात सहभागी करुन घेतले जात आहे. सिडकोतील एका उमेदवाराच्या प्रचारासाठी गेलेल्या ६५ महिलांना दुसऱ्या उमेदवाराच्या प्रतिनिधीने जास्त हजेरी देण्याचे आश्वासन दिले. या महिलाही दोन पैसे अधिक मिळतील या अपेक्षेने आधीच्या उमेदवाराचा प्रचार सोडून दुसऱ्या उमेदवाराच्या प्रचारासाठी



गेल्या. मात्र दिवसभर त्यांना एकाच जागी बसून ठेवण्यात आले. दुपारनंतर जाण्यास सांगितले. कोणतीही रोजंदारीही त्यांना न मिळाल्याने त्यांच्यात आणि प्रतिनिधी महिलेत आधी झटापट नंतर मारामारीच झाली.

ज्या उमेदवारांच्या प्रचारासाठी महिला दिवसभर ताटकळत बसून राहिल्या त्या उमेदवाराने चक्क सायंकाळी फोन बंद केला होता. यातील काही महिलांना अश्रू अनावर झाले. तर काहींनी तीव्र संताप व्यक्त केला. हाताशी आलेले काम सोडून दुसऱ्या उमेदवाराच्या मागे गेलेल्या महिलांना मात्र यातून चांगला धडा मिळाला. अशीही चर्चा दिवसभर रंगली होती. एका उमेदवाराचा प्रचाराला बोलविले. असता दुसराच उमेदवार घेवून गेला.

## संभाजीनगरात अजित पवार गटाच्या कार्यालयाला आग लावण्याचा प्रयत्न प्रचाराला गालबोट; राष्ट्रवादीच्या प्रचार यंत्रणेवर अज्ञातांचा हल्ला

दिव्य वतन /वृत्तसेवा

छत्रपती संभाजीनगर- महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण आधीच तापलेलं असताना, राष्ट्रवादी काँग्रेस या अजित पवार यांच्या पक्षाला धक्का देणारी गंभीर घटना समोर आली आहे. शहरातील वार्ड क्रमांक 16 मधील कैलास नगर परिसरात असलेल्या राष्ट्रवादीच्या पक्ष कार्यालयात अज्ञात व्यक्तीने आग लावण्याचा प्रयत्न केल्याची घटना उघडकीस आली आहे. ही घटना बुधवारी 7 जानेवारी रोजी पहाटे सुमारे 4.30 वाजण्याच्या सुमारास घडली असून, सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, निवडणूक प्रचाराच्या काळात घडलेल्या या प्रकारामुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कैलास नगर येथील राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या पक्ष कार्यालयाच्या बाहेर उभारलेल्या मंडपाला अज्ञात व्यक्तीने आग लावण्याचा



प्रयत्न केला. त्या वेळी परिसरात काही कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते. त्यांनी वेळीच प्रसंगावधान राखत आग वाढण्यापूर्वीच ती आटोक्यात आणली. त्यामुळे मोठा अनर्थ टळला. जर आग भडकली असती, तर कार्यालयातील साहित्य, प्रचार सामग्री तसेच आजूबाजूच्या वस्त्यांनाही धोका निर्माण झाला असता, अशी चर्चा स्थानिकांमध्ये होत आहे.या घटनेत कोणालाही इजा झाली नसली तरी, प्रचार कार्यालयाला लक्ष्य करण्यात आल्याने राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. छत्रपती संभाजीनगरमधून राष्ट्रवादीचे उमेदवार मयूर सोनवणे यांचा प्रचार सध्या जोरात सुरू असून, त्यांच्या प्रचार यंत्रणेवर थेट हल्ला करण्याचा हा प्रयत्न असल्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## नाराज कार्यकर्त्यांकडून इम्तियाज जलील यांच्या वाहनावर हल्ला- शिरसाट आणि सावेंनी पाळलेले गुंड म्हणत जलील यांचा पलटवार

दिव्य वतन /वृत्तसेवा

छत्रपती संभाजीनगर- शहरात राजकीय वातावरण चांगलेच तापले असून एमआयएम पक्षाचे नेते आणि माजी खासदार इम्तियाज जलील यांच्या गाडीवर हल्ला झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. उमेदवारी न मिळाल्याने नाराज झालेल्या पक्षातीलच काही कार्यकर्त्यांनी हा हल्ला केल्याची प्राथमिक माहिती पुढे आली आहे. अचानक झालेल्या या घटनेमुळे परिसरात एकच गोंधळ उडाला असून राजकीय वर्तुळात मोठी चर्चा सुरू झाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार,



जलील यांच्या वाहनावर संतप्त कार्यकर्त्यांनी हल्ला केल्यानंतर परिस्थिती तणावपूर्ण बनली. काही वेळातच मोठा जमाव जमा झाला आणि परिस्थिती नियंत्रणाबाहेर जाण्याची चिन्हे दिसू लागली. जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांना लाठीचार्ज करावा लागला. या कारवाईनंतर परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाल्याचे वृत्त नाही, मात्र वाहनाचे नुकसान झाल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. दरम्यान, या प्रकरणानंतर इम्तियाज जलील यांनी पोलिसांसमोर हा हल्ला झाला असून पोलिस काय कारवाई करतात? ते आता पाहणार असल्याचे म्हटले आहे. हल्ला करणाऱ्या गुंडांना पालकमंत्री संजय शिरसाट आणि मंत्री अतुल सावे यांचे सक्षण असल्याचा गंभीर आरोप देखील त्यांनी केला. या हल्ल्याप्रकरणी गुन्हा दाखल होण्याची शक्यता असून पोलिसांकडून घटनास्थळावरील परिस्थितीचा आणि संबंधित व्यक्तींचा तपास सुरू आहे. पक्षांतर्गत उमेदवारीवरून निर्माण झालेल्या नाराजीचे पडसाद रस्त्यावर उमटल्याने, आगामी काळात या प्रकरणाचे राजकीय परिणाम काय असतील, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## शब्दाला जागून प्रचारासाठी शहरात पाऊलही टाकू नये अंबादास दानवेंचा महायुतीवर थेट हल्ला

दिव्य वतन /वृत्तसेवा

छत्रपती संभाजीनगर -शहरातील भीषण पाणी टंचाईच्या प्रश्नाने आता राजकीय तापमान कमालीचं वाढवलं असून, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते अंबादास दानवे यांनी महायुती सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे. शहरातील नागरिकांना नियमित आणि पुरेसा पाणीपुरवठा करण्यात सरकार पूर्णपणे अपयशी ठरल्याचा आरोप करत, दानवेंनी सत्ताधाऱ्यांच्या कार्यपद्धतीवर तीव्र शब्दांत टीका केली. पाण्यासंदर्भात सातत्याने दिशाभूल करणाऱ्या महायुतीच्या नेत्यांना आता



छत्रपती संभाजीनगरमध्ये प्रचार करण्याचा कोणताही नैतिक अधिकार उरलेला नाही, असे ठाम मत त्यांनी व्यक्त केले. शहरातील प्रत्येक घरापर्यंत पाणी पोहोचवण्याच्या घोषणा केवळ कागदावरच राहिल्या असून, प्रत्यक्षात नागरिकांना पाण्यासाठी वणवण करावी लागत असल्याचं वास्तव दानवेंनी अधोरेखित केलं.

विशेषतः राज्याचे मंत्री संजय शिरसाट यांचा उल्लेख करत दानवेंनी अत्यंत बोचरी टीका केली. एकेकाळी स्वतःला जलसाम्राट, म्हणवून घेणारे आणि शहरभर बॅनरबाजी करणारे मंत्री आता पाण्याच्या प्रश्नावर 'मौनी बाबा' झाले असल्याचा सणसणीत टोला त्यांनी लगावला. शहरात पाण्याचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असताना, जबाबदार मंत्र्यांचे मौन नागरिकांच्या संतापात भर घालणारे आहे, असे दानवेंनी म्हटले. पाणीपुरवठा योजनांच्या उद्घाटनावेळी मोठमोठी आश्वासने दिली गेली, मात्र प्रत्यक्षात त्या योजनांचा लाभ नागरिकांपर्यंत पोहोचलाच नाही, असा आरोपही त्यांनी केला.

## निवडणुकांनंतर सुप्रिया सुळे केंद्रात, तर रोहित पवार राज्यात मंत्री शरद पवारांचे खायचे आणि दाखवायचे दात वेगळे, लक्ष्मण हाकेंचा हल्लाबोल

दिव्य वतन /वृत्तसेवा


मुंबई-"राज्यातील महापालिका आणि जिल्हा परिषद निवडणुकांचे निकाल लागताच महाराष्ट्राला एक वेगळेच चित्र पाहायला मिळेल. निवडणूक संपल्यानंतर सुप्रिया सुळे केंद्रात मंत्री होतील, तर रोहित पवार राज्याच्या मंत्रिमंडळात दिसतील. पवार कुटुंब कधीच वेगळे नव्हते आणि नाहीत, हे माझे भविष्य लवकरच खरे ठरेल," असा खळबळजनक दावा ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी केला आहे. '

अजित पवार यांच्यावर अत्यंत गंभीर आरोप करताना लक्ष्मण हाके यांनी पुण्याच्या राजकारणाकडे लक्ष वेधले. ते म्हणाले, "एकीकडे मुखी फुले-शाहू-आंबेडकरांचे नाव घ्यायचे आणि दुसरीकडे तिकीट वाटताना बोडके, आंदेकर, नायर यांसारख्या गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या लोकांना जवळ करायचे, हेच अजित पवारांचे राजकारण आहे. पुण्यात सत्ता आल्यावर अजित पवार पुन्हा पहाटे बाहेर पडतील, मोकळे भूखंड शोधतील आणि ते ५०० रुपयांत हडप करतील." पवार हे भ्रष्टाचाराचे महामेरू असून ते जनतेचे सेवक नसून अदानींसारखे केवळ एक 'उद्योजक' असल्याचा टोलाही त्यांनी लगावला.

शरद पवार यांच्या भूमिकेवर संशय व्यक्त करताना हाके म्हणाले, "शरद पवार वरवर भाजपसोबत जाणार नाही असे सांगत असले, तरी त्यांचे खायचे दात वेगळे आणि दाखवायचे वेगळे आहेत. ते राज्यातील भाजप नेत्यांना किंमत देत नाहीत, त्यांचे थेट 'कनेक्शन' पंतप्रधान मोदी आणि अमित शाह यांच्याशी आहे."

भाजपवर टीका करताना लक्ष्मण हाके यांनी कार्यकर्त्यांच्या नाराजीचा मुद्दा मांडला. "भाजप स्वतःला कितीही पवित्र गंगा मानत असली, तरी त्यांनी अजित पवारांसारखी 'भ्रष्ट गटारगंगा' पक्षात मिसळून घेतली आहे. ज्या पवारांना सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी लोकांनी भाजपला निवडून दिले, त्याच पवारांना भाजपने सत्तेत भागीदार केले. यामुळे भाजपचा सामान्य कार्यकर्ता अस्वस्थ आणि नाराज आहे," असे लक्ष्मण हाके म्हणालेत.

सध्याच्या राजकीय परिस्थितीवर भाष्य करताना लक्ष्मण हाके यांनी सर्वच पक्षांच्या सोयीच्या राजकारणाचा समाचार घेतला. "सध्या भाजपची शिंदे गटाशी आणि अजित पवारांशी युती आहे. अजित पवारांचे शरद पवारांशी आतून साटेलोटे आहे. शरद पवार काँग्रेस आणि ठाकरेंसोबत आहेत. ठाकरे आणि मनसेची जवळीक आहे, तर काँग्रेस वंचितसोबत बोलणी करतेय. थोडक्यात काय, तर सर्वच पक्ष एकमेकांसोबत



निवडणूक लढवत आहेत. यात सामान्य कार्यकर्ता मात्र बाजूला फेकला गेला असून, आगामी निवडणुका केवळ पैसा आणि गुंडगिरीच्या जोरावर लढल्या जातील," अशी भीती लक्ष्मण हाके यांनी व्यक्त केली.

१ २ ३ ४ ५ ६

# रोजगार आणि महागाई लक्षात घेता घड्याळाला साथ देऊन आपल्या प्रगतीचा मार्ग शोधा : कल्याणी गोंडाणे



दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी

नागपूर : राष्ट्रवादी काग्रेस पार्टी (अजित दादा गट) नागपुर महानगरपालिका प्रभाग क्रमांक. 5 (अ) मधून समाजसेविका म्हणून अधिकृत उमेदवार सौ. कल्याणी सनमकुमार गोंडाणे यांचे बोध चिन्ह घड्याळ यावर निवडणूक लढवित आहे. मला नागरिकांच्या आशीर्वादाने निवडुन आल्यावर प्रभागातील नागरिकांसाठी समाजातील गरिब होतकरू महिलांच्या कल्याणाकरिता कामगार योजना, संजय गांधी निराधार योजना, महिला युक्तिना रोजगारात्मक प्रशिक्षण लाडली बहना योजनाची मदत अश्या प्रकारच्या शासकिय योजनामधुन महिलांच्या कल्याणाकरिता मदत करण्याचे आश्वासन देत आहे. अनाथ, निराधार, निराश्रीत, एक पालक असल्याऱ्यांची मुले-मुली, दुर्धर आजारांनी पिडितांची मुले-मुली अश्या 0 ते 18 वयोगटातील बालकांना महाराष्ट्र शासनाच्या महिला व बाल विकासाची क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, बालसंगोपन योजनेतुन शिक्षण व संगोपनासाठी अर्थसाहय मिळवुन देऊ. युवक - युवतिनां कौशल्य विकास प्रशिक्षणाच्या माध्यमातुन रोजगार व विविध शासकिय योजनेअंतर्गत अर्थसाहय मिळवुन देवुन रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात येईल. प्रभागातील संपुर्ण निवासी नागरिकांची आरोग्य, स्वच्छता, पिण्याचे पाणी, महिलांची सुरक्षा यांची काळजी घेण्यात येईल. महिला सशक्तीकरणास भर लहान मुलांचा शारीरिक विकासासाठी जलतरण व क्रिडा संकुलः तसेच सार्वजनिक जागा स्वच्छ, सुरक्षित व सुंदर परिसरनिर्मिती : महिला व युवक विकास कौशल्य प्रशिक्षण आणि रोजगाराच्या संधी : स्वच्छ व आरोग्यदायी परिसर रोज कचरा उचल व नियमित साफसफाई करून दिली जाणार ! शिक्षण सुधारणा शाळा व अंगणवाड्यांच्या गुणवत्तेवर भर : आरोग्य सेवा मोफत तपासणी शिबिरे व योजनांची प्रभावी अंमलबजावणी : नागरिक तक्रार निवारण वेळेत व परिणामकारक उपाययोजना : पथदिवे - प्रत्येक गल्लीत पुर्ण क्षमतेने स्ट्रीट लाईट व्यवस्था : खुले व पारदर्शक प्रशासन नागरिकांशी सातत्याने थेट संवाद : पाणीपुरवठा 24 तास शुध्द, सुरक्षित आणि प्रमाणात पाणी रस्ते व गटारे -मजबुत रस्ते आणि योग्य गटार व्यवस्थापन : शासकिय योजना प्रत्येक वस्तीत शासकिय योजना मदत कक्षाची स्थापना : ग्रथालय लायब्ररीची स्थापना : लाडकी बहिण योजना लाडकी बहिन योजनेचे 2100 रू होणे करिता सर्वोतपरी प्रयत्न केला जाणार आहे. घडयाळ चिन्हावर बहुमताने विजय करून द्यावे. अशी नम्र विनंती केली आहे.

## नागपूर गार्डन क्लबतर्फे 123 वे वार्षिक फुलांचे प्रदर्शन 11 जानेवारीला




दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी

नागपूर- गार्डन क्लबतर्फे १२३ वे वार्षिक फुलांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. हे प्रदर्शन (रविवारी ) दिनांक ११ जानेवारी रोजी कुसुमताई वानखेडे हॉल, नॉर्थ अंबाझरी रोड, नागपूर येथे सकाळी ११ वाजता. होणार आहे. या प्रदर्शनात निसर्गसौंदर्याची नेत्रदीपक मांडणी पाहायला मिळेल. गुलाब, ग्लॅडिओलाय, फुलांची सजावट, इनडोअर रोपे, कॅक्टस व सुक्युलंट्स, बोन्साय रोपे इत्यादींचा यात समावेश असेल.

प्रदर्शन सकाळी ११.३० ते रात्री ८ वाजेपर्यंत असेल. अशी माहिती पत्रपरिषदेमध्ये दिली. या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून शालेय विद्यार्थ्यांसाठी विशेष उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे, ज्याचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये निसर्ग आणि बागकामा विषयी प्रेम आणि कुतूहल जागृत करणे हा आहे. या उपक्रमांत फुलांची रांगोळी स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, सर्व निसर्गप्रेमी, बागकाम प्रेमी आणि विद्यार्थ्यांनी या फुलांच्या सोहळ्यात सहभागी व्हावे आणि त्याचा आनंद लुटावा, अशी विनंती केली आहे. पत्रपरिषदेला अध्यक्षा अनुजा परचुरे, उपाध्यक्ष डॉ.राजश्री बापट आणि जॉईंट सेक्रेटरी रेखा देशमुख यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाला 11 जानेवारी रोजी, सकाळी 11 वाजता. दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्र नागपूरच्या आस्था कार्लेकर यांच्या शुभहस्ते उद्घाटन होईल. असे पत्रकार परिषदेमध्ये अनुजा परचुरे यांनी सांगितले.

## महत्त्वाचे...

### भारतीय रिअल इस्टेट सल्लागार/एजंट वेल्फेअर युनियनचा 12 जानेवारी वर्धापनदिन सोहळा

नागपूर : रिअल इस्टेट क्षेत्रात कार्यरत सल्लागार, एजंट व विकासकांच्या हितासाठी सातत्याने कार्य करणारी भारतीय रिअल इस्टेट सल्लागार/एजंट वेल्फेअर युनियन आपल्या यशस्वी कार्यकाळाची दोन वर्षे पूर्ण होत असून या निमित्ताने द्वितीय वर्धापनदिन सोहळ्याचे आयोजन सोमवारला 12 जानेवारीला दुपारी 3 वाजता. प्लॉट नं.10- ए, पहिला माळा, चंदननगर, जय पेंट अँ, हकीमी हार्डवेअर जवळ, संगम रेस्टॉरंट रोड, मेडिकल चौक नागपूर करण्यात आलेले आहे. युनियनच्या स्थापनेपासून आजपर्यंत रिअल इस्टेट क्षेत्रात पारदर्शकता निर्माण करणे, सल्लागार व एजंट यांच्या अडचणी प्रशासनापर्यंत पोहोचवणे तसेच संघटनेच्या माध्यमातून एकजूट निर्माण करणे या उद्देशाने प्रभावी कार्य करण्यात आले आहे. अल्पावधीतच युनियनने रिअल इस्टेट क्षेत्रात आपली स्वतंत्र व भक्कम ओळख निर्माण केली आहे. या वर्धापन दिन सोहळ्यास नागपूर व परिसरातील रिअल इस्टेट व्यावसायिक, सल्लागार, एजंट, बिल्डर्स व डेव्हलपर्स मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमात युनियनच्या आतापर्यंतच्या कार्याचा आढावा घेण्यात येणार असून भविष्यातील धोरण व कार्ययोजना यावरही मार्गदर्शन करण्यात येणार आहे. युनियनच्या पदाधिकाऱ्यांनी सर्व रिअल इस्टेट व्यावसायिकांना या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. सर्वांच्या उपस्थितीमुळे संघटनेचे मनोबल वाढेल तसेच रिअल इस्टेट क्षेत्रातील एकात्मतेला बळ मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.



### डॉ.सुषमा चक्रवर्ती यांच निधन

नागपूर : पी.के. बी.चक्रवर्ती (निवृत्त आयपीएस), यांची पत्नी डॉ. सुषमा यांच निधन मंगळवारी, ०६ जानेवारी रोजी वलसाड, गुजरात येथे निधन झाले. त्या ७७ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात पती, कन्या इंद्राणी, डॉ. मोहना, जावई डॉ. सत्यजित, नातू इंद्रनील, नात डॉ. सागरिका आणि प्रीतीश असा मोठा परिवार आहे.



### वेणूताई खोडसकर यांचे निधन

नागपूर : चंदननगर येथील प्लॉट नंबर 452 नागपूर येथील रहिवासी वेणूताई महादेवराव खोडस्कर हिचे वृद्धपकाळाने निधन झाले. मृत्युसमयी त्या 93 वर्षाचे होत्या. 8 जानेवारी रोजी सकाळी १०:३० वाजता मोक्ष घाटावर अंतिम संस्कार करण्यात येईल. त्यांच्या पश्चात बराच मोठा परिवार आहे.

## पारवे महाविद्यालयात सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी



दिव्य वतन /तालुका प्रतिनिधी

भिवापूर :- श्री पारवे बहुउद्देशीय शिक्षण संस्थेद्वारा संचालित पारवे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय तसेच पारवे कॉलेज ऑफ नर्सिंग येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रवेश यादव होते. यावेळी पारवे कॉलेज ऑफ नर्सिंगच्या प्राचार्या कांचन अटवाल व उपप्राचार्या गोसावी मॅडम यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पमाला अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. देवेंद्र परशुरामकर यांनी केले. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. यादव यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत, स्त्री शिक्षणासाठी त्यांनी केलेला संघर्ष व समाजसुधारणेतील योगदान अधोरेखित केले. शेण, दगडांचा मार सहन करतही सावित्रीबाईंनी स्त्री शिक्षणाचा व स्त्रीमुक्तीचा मार्ग अविरतपणे पुढे नेला. ज्योतिबा फुले यांच्या सोबत त्यांनी पुण्याच्या भिडे वाड्यात मुलींसाठी पहिली शाळा सुरू करून शिक्षणाचा पाया मजबूत केला, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे संचालन प्रा. वैशाली राऊत यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. निकिता यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संस्थेच्या अध्यक्षा सौ. सुषमाताई राजु पारवे व सचिव राजु पारवे यांचे सहकार्य लाभले.

## गणपती हनुमान मंदिर ट्रस्ट वतीने प्राचार्य बुटे यांचा सेवापुर्ती सत्कार

दिव्य वतन /तालुका प्रतिनिधी

काटोल - अंगारक गणेश चतुर्थी निमित्त दि. 6 जानेवारीला अति प्राचीन गणपती हनुमान ट्रस्ट बाजारगाव वतीने लाखोटीया भुतडा विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय कोंढाळी येथील से. नि. प्राचार्य सुधीर चंपतराव बुटे यांचा सेवापुर्ती सत्कार ट्रस्टचे अध्यक्ष नानासाहेब गावंडे यांचे हस्ते करण्यात आला.

याप्रसंगी ट्रस्टचे सचिव राजेंद्र घावट, विश्वस्त मंगेश भड. पंकज गलाट, प्रकाश भोले,राजू पाटील काळबांडे, राधेश्याम घाटे,वसंत बघेल,एबीपी माझा वाहिनी नागपूरचे तुषार कोहळे,ज्येष्ठ पत्रकार ब्रिजेश तिवारी, राजेंद्र खामकर, मुख्याध्यापक दिलीप वैद्य मित्रपरिवार आदी उपस्थित होते. प्राचार्य सुधीर बुटे यांचे कार्यकाळात माध्यमिक शालांत परीक्षेत बोर्डात प्रथम, द्वितीय येण्याचा बहुमान विद्यालयाला मिळाला. इयत्ता 10 व 12 निकालाची गुणवत्ता व टक्केवारी वाढण्यास सुयश मिळाले. मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा स्पर्धेत 2023-24 जिल्ह्यात सर्वप्रथम 11 लक्षाचा पुरस्कार, सन 2024-25 स्पर्धेत शाळेची नागपूर विभागात निवड झाली. शाळेची शिस्त व पटसंख्या वाढ, विविध विभागात तसेच स्पर्धेत विदयार्थ्यांनी अव्वल क्रमांक मिळविण्यास अभूतपूर्व यश मिळविले आहे. याकरिता संस्थेचे व्यवस्थापक मंडळ, शिक्षक व कर्मचारी वृंद पालक, लोकप्रतिनिधी, पत्रकार, प्रशासकीय मंडळी, ग्रामस्थ आदींचे मोलाचे सहकार्य लाभले.



## आदिवासी विकास विभाग अंतर्गत राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा अमरावती- 2026 सोनू बेठेकर (आंतरराष्ट्रीय खेळाडू, राज्यस्तरीय व्हॉलीबॉल पंच) सन्मान चिन्ह देऊन सत्कार

दिव्य वतन /तालुका प्रतिनिधी

सोनकलालजी (सोनू बेठेकर) यांचा आंतरराष्ट्रीय खेळाडू व निःशुल्क क्रीडा प्रशिक्षक म्हणून आदिवासी विकास विभाग अंतर्गत अमरावती येथे राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा महोत्सव दिनांक 5 आणि 6, 7 जानेवारी 2026 ला घेण्यात आल्या. तिथे यांचा भव्य दिव्य पद्धतीने सन्मान चिन्ह देऊन सत्कार आणि गौरव करण्यात आला, कारण सोनकलालजी (सोनू बेठेकर) स्वतः आदिवासी आणि ग्रामीण विभागातील असल्यामुळे गरीब विद्यार्थ्यांची जान ठेवतात.

त्यामुळे आशा ग्रामीण आणि दुर्गम विभागातील विद्यार्थ्यांना समोर नेण्यासाठी नेहमी धडपडत असतात. निःशुल्क क्रीडा प्रशिक्षण देऊन देशातील वेगवेगळया क्रीडा पातळीवर स्पर्धेसाठी विद्यार्थांना स्व खर्चातून घेऊन जातात. आशा चांगल्या व्यक्तीमत्वचा नक्कीच गौरव आणि सत्कार झाला पाहिजे म्हणून या गोष्टीला पाठिंबा देऊन राज्यस्तरीय आदिवासी विकास मंच अमरावतीयांचे हस्ते मा. रविंद्र ठाकरे आयुक्त माहिती आयोग विभाग, मा.आयुषी सिंह अप्पर आयुक्त अमरावती व इतर मा अधिकारी गण या सगळ्यांनी त्यांचा गौरव करण्यासाठी त्यांना रामटेक वरून बोलावण्यात आले व त्यांच्या सत्कार करण्यात आला. आणि सोनू बेठेकर यांनी सर्व विभागातील अधिकारी वर्गांचे धन्यवाद मानले.ही बाब रामटेक तालुक्या विद्यार्थी व पाल्या तसेच त्यांच्या सोबत ताई गोळवलकर महाविद्यालतील मित्र मंडळी व सहपाठी आणि सर्व मा. प्राध्यापक वृंदासाठी गौरवाची गोष्ट आहे. याचे श्रेय मावस्कर साहेब (सहायक प्रकल्प अधिकारी साहेब) आणि कार्यकारी प्राचार्य डॉ. विजय राऊत यांना जाते.



## माजी मुख्याध्यापकांकडून विद्यार्थ्यांना स्वेटर वाटप

दिव्य वतन /तालुका प्रतिनिधी




काटोल -आज दिनांक ०१जानेवारी२०२६ वार गुरुवार ला जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कारला पंचायत समिती काटोल जिल्हा नागपूर चे माजी मुख्याध्यापक श्री.मोहनजी डांगोरे जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त यांनी विद्यार्थ्यांना स्वेटर वाटप केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री.निलेशजी बेहनिया अध्यक्ष शा.व्य.स.कारला, विशेष अतिथी श्री.नरेंद्रजी बोढाळे शिक्षण विस्तार अधिकारी पं.स.काटोल, प्रमुख पाहुणे श्री.राजूजी धवड केंद्रप्रमुख पारडसिंगा,श्री. गंगारामजी पडोलिया, गणेशजी मोहरिया,प्रकाशजी बिंडीया, दिपिका मोरोलिया,किर्ती गुजवार,कुमूद नौकरीया अंगणवाडी सेविका,सौ.वनिता गोरे मुख्याध्यापक तसेच श्री. हेमराज कळंबे सहाय्यक शिक्षक उपस्थित होते.तसेच या कार्यक्रमाप्रसंगी डांगोरे कुटुंबातील सौ.अल्काताई डांगोरे(पत्नी),श्री.सौरभ डांगोरे (मुलगा),सौ.गौरी डांगोरे(सून) उपस्थित होते.यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना स्वेटर वाटप करण्यात आले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री.कळंबे सर यांनी केले तर आभार प्रदर्शन सौ.कुमूद नौकरीया यांनी केले. बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले या उक्ती प्रमाणे सरांनी स्वातंत्र्यदिनला आपल्या भाषणात जाहीर केल्याप्रमाणे सर्व विद्यार्थ्यांना स्वेटर वाटप केले.त्याच्या या कार्याचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.

## सिटू तर्फे 'आशा दिवस उत्सव' मोठ्या थाटात संपन्न

दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी

नागपूर :आशा व गटप्रवर्तक कर्मचारी युनियन (सिआयटीयू) नागपूर जिल्हा तर्फे दरवर्षीप्रमाणे यंदाही आशा दिवस उत्सव मोठ्या थाटामाटात सेवाश्रम येथे नुकताच संपन्न झाला. वर्षभर आशा वर्कर मोबदला मिळून सुद्धा नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेत सेवा देण्याकरता तत्पर असतात. हिंदीमध्ये असलेले कलागुण सेवा देण्याच्या जिम्मेदारीतून नाहीसे झालेले दिसतात. अशा परिस्थितीमध्ये आशा व गटप्रवर्तक कर्मचारी युनियन (सिआयटीयू ) करमणुकीचा भाग व त्या महिलांमध्ये असलेले विविध प्रकारचे कलागुण प्रदर्शित करण्याची त्यांची इच्छा पूर्ण करून देण्याचे काम सिटू तर्फे एका मोठ्या मंचावर केले जाते. त्यामधून त्या प्रत्येक महिलेला समाधान मिळते. संघटनेच्या चांगले कलाकार निर्माण करणे हा वार्षिक स्नेहसंमेलन करून त्यामधून मनमोहक डांस, नाटक व गायनसह उत्कृष्ट भोजन व्यवस्था करून संपन्न केले जाते. संघटनेतर्फे जिल्हाध्यक्ष कॉ. राजेंद्र साठे यांच्या प्रेरणेतून जिल्हा महासचिव कॉ. प्रीती मेश्राम यांच्या अथक परिश्रमातून रंजना पौनीकर, लक्ष्मी कोट्टेजवार, सरिता थोटे, मंदा गंधारे यांच्या सहयोगातून संपन्न झाला.









## महत्त्वाचे...

### 14.43 लाखांच्या गुटख्यासह मुद्देमाल जप्त:सहा जणांविरुध्द गुन्हे, दोघांना अटक



अकोला : राज्यात प्रतिबंधित असलेला मात्र शहरात सर्रास मिळणारा गुटखा गुन्हे शाखेने मंगळवारी (दि. ६) जप्त केला आहे. हा गुटख्याचा साठा इंदौरवरुन शहरासह इतरत्र विक्रीसाठी आला असल्याची माहीती गुन्हे शाखेच्या पथकाला मिळाली होती. या माहीतीच्या आधारे पोलिसांनी ही कारवाई केली. यावेळी पोलिसांनी दोघांना अटक केली असून गुटखा मागवणाऱ्या तिघांसह सहा जणांविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.ईश्वर भगवानसिंग सुर्यवंशी (४०, रा. आहेरखेडी, इंदौर, मध्यप्रदेश), ट्रान्सपोर्टचा मालक अ. सलीम अ. कादर ३५, रा. ट्रान्सपोर्टनगर, अमरावती या दोघांना पोलिसांनी अटक केली आहे. याचवेळी अवध किशोर पांडे (रा. इंदौर), दानिश (रा. माहुली), साजीद (रा. नेर जि. यवतमाळ) आणि साईराम (रा. यवतमाळ) या चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा गुटख्याचा साठा दानिश, साजीद व साईराम यांनी बोलवल्याचे पोलिसांना निष्पन्न झाले आहे. गुन्हे शाखेचे प्रमुख संदीप चव्हाण, एपीआय मनिष वाकोडे व त्यांचे पथक गोपनिय माहीतीच्या आधारे ट्रान्सपोर्टनगर भागात पोहचले. त्यांनी एका संशयित मालवाहू वाहनाची पाहणी केली, त्यावेळी वाहनात चालक ईश्वर सूर्यवंशी होता.

### अकोटमध्ये भाजप-MIM आघाडी तर अंबरनाथमध्ये काँग्रेससोबत हातमिळवणी




अकोला : पार्टी विथ डिफरन्स, अशी स्वतःची ओळख सांगणाऱ्या भाजपने सत्तेसाठी आपल्या राजकीय तत्त्वांनाच मुरड घातली आहे का, असा सवाल पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. एका बाजूला भाजप देशभर काँग्रेसविरोधी आक्रमक भूमिका घेत असल्याचे चित्र आहे, तर दुसऱ्या बाजूला स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये सत्ता मिळवण्यासाठी विरोधी विचारधारांच्या पक्षांशी थेट हातमिळवणी केली जात असल्याचे दिसते. अकोला जिल्ह्यातील अकोट नगरपालिका आणि ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ नगरपरिषदेत घडलेल्या घडामोडींमुळे भाजपच्या राजकीय भूमिकेतील विसंगती अधिक ठळकपणे समोर आली आहे. अकोट नगरपालिकेतील सत्तास्थापनेची गणिते पाहता भाजपला बहुमत मिळालेले नाही. 35 सदस्यांच्या नगरपालिकेत सध्या 33 जागांची निवडणूक झाली असून भाजपला केवळ 11 जागांवर समाधान मानावे लागले आहे. तरीही भाजपच्या माया धुळे या नगराध्यक्षपदी विजयी झाल्या. मात्र, बहुमताअभावी सत्तेचा डोलारा उभा करण्यासाठी भाजपने 'अकोट विकास मंच' या नव्या आघाडीची स्थापना केली आहे. या मंचात सर्वात लक्षवेधी बाब म्हणजे भाजपनंतर सर्वाधिक पाच नगरसेवक असलेल्या एमआयएमचा थेट समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे अकोटमध्ये भाजप आणि एमआयएम यांच्यातील आघाडीने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.या 'अकोट विकास मंचा'त भाजपसोबत ठाकरेंची शिवसेना, शिंदेंची शिवसेना, अजित पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस, शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस, बच्चू कडूंचा प्रहार जनशक्ती पक्ष आणि एमआयएम हे सर्व पक्ष एकत्र आले आहेत. या नव्या आघाडीची अधिकृत नोंदणी

# बेईमानी करणाऱ्यांना धडा शिकवणारच, नवनीत राणांचा थेट इशारा राजकीय रणशिंग फुंकलं; भाजपमधील अंतर्गत गटबाजीवर बोट

दिव्य वतन /वृत्तसेवा

अमरावती - अमरावतीच्या राजकारणात पुन्हा एकदा खळबळ उडवणारे वक्तव्य करत भाजप नेत्या नवनीत राणा यांनी थेट आक्रमक भूमिका घेतली आहे. माझ्या विरोधात ज्यांनी काम केलं, जे खुल्या मंचावर 'यावेळी 400 पार'च्या घोषणा देत होते, ते चेहरे आठवणीत ठेवा, असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला. माझ्या पराभवामागे विरोधकांपेक्षा आपल्या गोटातीलच काही लोक कारणीभूत आहेत. आमच्यातच घात करणारे लोक होते, असे सांगत त्यांनी अप्रत्यक्षपणे भाजपमधील अंतर्गत गटबाजीवर बोट ठेवलं. माझा पराभव म्हणजे केवळ नवनीत राणांचा पराभव नाही, तर तो संपूर्ण शहराचा पराभव आहे, असा दावा करत त्यांनी आपली नाराजी उघडपणे व्यक्त केली.

लोकसभा निवडणुकीत झालेल्या पराभवावर बोलताना नवनीत राणा यांनी भावनिक पण तितक्याच आक्रमक शब्दांत प्रतिक्रिया दिली. लोकसभेत नुकसान कुणाचं झालं, तर आमच्या मुलांचं झालं, असं म्हणत त्यांनी हा पराभव वैयक्तिक वेदनेशी जोडला. मात्र, ही वेदना गिळून गप्प बसणार नाही, असंही त्यांनी स्पष्ट केलं. ज्यांनी माझ्याशी बेईमानी केली, ज्यांनी पाठीत खंजीर खुपसला, त्यांचा बदला घेतल्याशिवाय नवनीत राणा शांत बसणार नाही, असा ठाम निर्धार त्यांनी जाहीरपणे व्यक्त केला. त्यांच्या या वक्तव्यामुळे भाजपमधील अंतर्गत राजकारण पुन्हा चर्चेच्या केंद्रस्थानी आलं आहे.

याच भाषणात त्यांनी अमरावती शहराच्या सुरक्षेबाबत मोठी घोषणा केली. शहराच्या प्रत्येक गल्लीबोळात सीसीटीव्ही कॅमेरे बसवणार असल्याचं त्यांनी जाहीर केलं. भाजपचा महापौर निवडून आला, तर शहरात सर्वप्रथम सीसीटीव्ही कॅमेरे आणि आवश्यक त्या ठिकाणी स्पीड ब्रेकर बसवले जातील, असं आश्वासन त्यांनी दिलं. आपण खासदार असताना अवघ्या पाच वर्षांत अमरावतीसाठी मेडिकल कॉलेज आणि पायलट ट्रेनिंग सेंटर आणलं, याची आठवण करून देत त्यांनी आपल्या कामाचा लेखाजोखा मांडला. सत्ता असो वा नसो, शहराच्या विकासासाठी मी लढत राहणार, असा संदेश त्यांनी दिला.



भाषणादरम्यान एक प्रसंग विशेष चर्चेचा ठरला. मंचाच्या टोकावर उभ्या असताना भाजपच्या काही उमेदवारांनी 'भाभी, खाली बघा, पडाल' असं सांगितल्याचा उल्लेख त्यांनी केला. त्यावर 'आता मी पडणार नाही' असं प्रत्युत्तर देत त्यांनी आपल्या राजकीय संघर्षाचा संदर्भ दिला. आतापर्यंत खूप काही सहन केलं, पण आता परिस्थिती बदलली आहे. ज्यांनी माझ्याशी बेईमानी केली, त्यांच्याशी मी आता सौम्य वागणार नाही, असा इशाराच त्यांनी या विधानातून दिला.

नवनीत राणा यांनी यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार संजय खोडके आणि त्यांच्या पत्नीवरही जोरदार टीका केली. मी कोणाची चमचेगिरी करण्यासाठी उभी नाही, असं ठणकावून सांगत त्यांनी थेट खोडके दाम्पत्यावर निशाणा साधला. कोणी घड्याळ घेऊन उभं आहे आणि उलटे काटे फिरवायचा प्रयत्न करत आहे, असा टोला त्यांनी लगावला. यावेळी ते तर त्यांचं नशीब होतं की मी विधानसभेत फिरले नाही, नाहीतर दोन हजारांनी निवडून आले असते ना, दहा हजारांनी पडले असते, इतकी ताकद या भगव्यामध्ये आहे, अशी घणाघाती टीका त्यांनी केली.आपल्या राजकीय ताकदीचा उल्लेख करताना नवनीत राणा म्हणाल्या की, 2019 मध्ये याच लोकांनी मला निवडून दिलं होतं. माझी ताकद लोकांमध्ये आहे. मी लोकांची सेवा करण्यासाठी उभी आहे, कोणाच्या दावणीला बांधून चमचेगिरी करण्यासाठी नाही. 'आता पुढे कशी खासदार होते ते आम्ही बघतो' असं म्हणणाऱ्यांना उद्देशून त्यांनी, 'तुमच्यात दम असेल तर दाखवा' असा खुला आव्हान दिलं.

# ईव्हीएम प्रशिक्षणात मशीनबाबत दिल्या महत्त्वपूर्ण सूचना

## निवडणूक प्रक्रिया पारदर्शक ठेवण्यावर भर

दिव्य वतन /वृत्तसेवा

आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर निवडणूक प्रक्रिया अधिक पारदर्शक, सुरक्षित व कार्यक्षमरित्या राबवण्याच्या दृष्टीने महानगरपालिकेच्या वतीने महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले.निवडणूक अधिकारी तथा मनपा आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या मार्गदर्शनात मंगळवारी ६ जानेवारी रोजी क्षेत्रीय अधिकारी (झेडओ) यांच्यासाठी ईव्हीएम(इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीन) संदर्भात सविस्तर प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सदर प्रशिक्षण विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात पार पडले.

या प्रशिक्षण कार्यक्रमात ईव्हीएमची रचना, कार्यपद्धती, मतदान प्रक्रियेपूर्वीची तयारी, मतदानाच्या दिवशी करावयाची कारवाई तसेच मतदानानंतरची सुरक्षित साठवणूक व मतमोजणी प्रक्रियेबाबत सखोल माहिती देण्यात आली. यासोबतच ईव्हीएम संदर्भातील नियम, मार्गदर्शक सूचना, आपातकालीन परिस्थितीत घ्यावयाची काळजी तसेच तक्रार निवारण प्रक्रियेवरही प्रकाश टाकण्यात आला. निवडणूक प्रक्रिया ही लोकशाहीचा कणा असून ती कोणत्याही त्रुटीशिवाय पार पाडणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी अधिकारी व कर्मचारी यांना अद्ययावत प्रशिक्षण देणे गरजेचे असल्याचे यावेळी सांगण्यात आले. निवडणूक प्रक्रिया पूर्णतः पारदर्शक व निष्पक्ष ठेवावी. कोणत्याही परिस्थितीत नियमांचे काटेकोर पालन होईल याची दक्षता घ्यावी.सदर प्रशिक्षणात अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त योगेश पिठे, उपायुक्त दादाराव डोलारकर, निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी श्रद्धा बबन उदावंत, यांच्यासह निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी अनिल भटकर, निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी दुर्गा देवरे, निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी प्रसन्नजीत चव्हाण, निवडणूक निर्णय अधिकारी तथा वन जमाबंदी अधिकारी विवेकानंद काळकर, निवडणूक निर्णय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे आदी उपस्थित होते.



# लता मंगेशकर हॉस्पिटल येथे विशेष गरजा असलेल्या विशेष बालकांसाठी मोफत आरोग्य शिबिर संपन्न

दिव्य वतन /वृत्तसेवा

नागपूर- नव्या वर्षाच्या आगमनानिमित्त एनकेपी साळवे वैद्यकीय महाविद्यालय व लता मंगेशकर हॉस्पिटल, हिंगणा रोड, नागपूर येथे नुकतेच विशेष गरजा असलेल्या विशेष बालकांसाठी एका परिपूर्ण आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. बालरोग विभागातील उच्च शिक्षित व अनुभवी तज्ञांनी बालरोग बाह्यरुग्ण विभागात एकूण 25 विशेष बालकांची मोफत सखोल तपासणी व मूल्यमापन केले. या शिबिरामध्ये जन्मजात मेंदूला झालेले गंभीर नुकसान (सेरेब्रल पाल्सी), बोलण्यावर व वागण्यावर गंभीर परिणाम (ऑटिझम स्पेक्ट्रम डिसऑर्डर), अतिरिक्त गुणसूत्रांच्या अनुवांशिकतेमुळे बौद्धिक अपंगत्व (डाउन सिंड्रोम) तसेच इतर मेंदू व शारीरिक अनुवांशिक विकार (न्यूरोजेनेटिक डिसऑर्डर) असलेल्या बालकांचा समावेश होता. प्रत्येक बालकाचे शारीरिक, मानसिक व बौद्धिक विकासात्मक मूल्यांकन करून पालकांना आवश्यक वैद्यकीय मार्गदर्शन व पुढील उपचाराबाबत सूचना देण्यात आल्या. हे शिबीर झंझावात या स्वयंसेवी संस्थेच्या आणि निवासी मतिमंद मुलांचे विद्यालय, मोठा ताजबाग यांच्या सहकार्याने यशस्वीरित्या राबविण्यात आले. विशेष गरजा असलेल्या विशेष बालकांच्या उत्तम आरोग्यासाठी असे सर्वसमावेशक शिबीर अत्यंत आवश्यक असून भविष्यात देखील शक्यतो दर 1 ते 2 महिन्यांच्या कालावधीत ते आयोजित करण्यात येतील, असे अधिष्ठाता डॉ सजल मित्रा यांनी सांगितले. सामाजिक उपक्रमांतर्गत लता मंगेशकर हॉस्पिटल हे उत्कृष्ट आरोग्य सेवा प्रदान करण्यासाठी कटिबद्ध असून विशेष बालकांना आपण सर्वोतोपरी मदत करणार, असे आश्वासन व्हीएसपीएम अकॅडमी ऑफ हायर एज्युकेशन, नागपूरचे उपाध्यक्ष आमदार डॉ आशिषराव देशमुख यांनी दिले. प्रा डॉ नितीन देवस्थळे (उपअधिष्ठाता व वैद्यकीय अधीक्षक) यांच्या सहकार्याने आणि प्रा डॉ गिरीश नानोटी (बालरोग विभाग प्रमुख) यांच्या नेतृत्वात डॉ अंजली एडबर, डॉ प्रदीप पझारे, डॉ हिमांशू दुवा आणि इतर बालरोग विशेषज्ञांनी आपल्या अमूल्य सेवा या शिबिरात प्रदान केल्या.





# उपमुख्यमंत्र्यांसह महसूलमंत्री, केंद्रीय राज्यमंत्री शहरात

## काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांचेही आज उमेदवारांच्या प्रचारार्थ आगमन

दिव्य वतन /वृत्तसेवा

अमरावती- महानगर पालिका निवडणुकीच्या प्रचारात दिवसेंदिवस रंगत चढत आहे. आपआपल्या पक्षाचे उमेदवार विजयी व्हावेत, यासाठी पक्षाचे मोठे नेते मेहनत घेत आहेत. दरम्यान बुधवारी (दि. ७) शिवसेनेचे प्रमुख उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव, भाजपाचे महसूल तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ शहरात येणार आहेत. या नेत्यांचे दिवसभर विविध कार्यक्रम होणार आहेत.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची शिवसेना उमेदवारांच्या प्रचारार्थ शहरातील नेहरु मैदानात दुपारी १२ वाजता जाहीर सभा होणार आहे.

त्या सभेसाठी केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव हे सुद्धा उपस्थित राहणार आहेत. तसेच सायंकाळी साडेचार वाजता हॉटेल ग्रॅन्ड महफिल येथे महसूल तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावकुळे यांची साडेचार वाजता प्रबुध्द सभा होणार आहे.









त्यानंतर सायंकाळी पाच ते रात्री नऊ वाजेपर्यंत भाजपा उमेदवारांच्या प्रचारार्थ आशियाड चौक, विलासनगर, श्री संत कंवरनगर चौक, रविनगर आणि बडनेरा नवीवस्ती आठवडी बाजार मैदानात जाहीर सभा होणार आहे. बुधवारी सकाळी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ शहरात येणार आहे. ते मनपा निवडणुकीसंदर्भात काँग्रेसचे स्थानिक नेते, पदाधिकाऱ्यांकडून आढावा घेणार आहेत, तसेच सकाळी अकरा वाजता प्रसार माध्यमांच्या प्रतिनिंधीसोबत संवाद साधणार आहेत. या नेत्यांचे दिवसभर विविध कार्यक्रम होणार आहेत. यामध्ये जाहीर सभा अन् बैठकाही घेतल्या जाणार आहेत.

# शहर भाजपतर्फे पत्रकारांचा सत्कार

दिव्य वतन /वृत्तसेवा

भिवापूर :- मराठी पत्रकार दिनानिमित्त शहर भाजपतर्फे मंगळवारी येथील पत्रकारांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांनी ६ जानेवारी १८३२ रोजी 'दर्पण' हे पहिले मराठी वृत्तपत्र सुरू केले. त्या ऐतिहासिक दिनाचे औचित्य साधून तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष शरद मिरे, सचिव अमर मोकाशी, ज्येष्ठ पत्रकार सदाशिव नान्रे, पंढरी हिवसे, शाबीर पटेल, नरेंद्र ढोणे, तौफिक पटेल, रणजित रक्षिये व प्रीती जांभुळकर यांचा शहर भाजपतर्फे सत्कार करण्यात आला.

स्थानिक विश्रामगृहात आयोजित कार्यक्रमास नगराध्यक्षा सुषमा श्रीरामे, भाजप जिल्हा महामंत्री आनंद गुप्ता, ॲड. प्रभाकर नागोसे, नवनिर्वाचित नगरसेवक विवेक ठाकरे, रुचित पंजलवार, पिंटू श्रीरामे, दिनेश रामटेके, नाझिम बेग, कांचन बालपांडे, जया नंदनवार, वैशाली पेंदाम, शुद्धरेखा तभाने, मिथिला तिडके यांच्यासह भाजयुमो जिल्हा महामंत्री हिमांशू अग्रवाल, धनंजय चौधरी, श्री तभाने, श्रीकांत बालपांडे, महादेव नंदनवार तसेच भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन नीलिमा नागोसे यांनी केले.



# मुद्रित माध्यमांचे महत्त्व अबाधित आहे- पोलिस आयुक्त राकेश ओला

## श्रमिक पत्रकार संघाचा पुरस्कार वितरण सोहळा उत्साहात

दिव्य वतन /वृत्तसेवा

अमरावती: वेगवेगळी माध्यमे उदयास आली आहे. पण, मुद्रित माध्यमांचे महत्त्व अबाधित आहे. बरेचदा आम्हाला आमच्या गोपनीय यंत्रणेच्याही आधी पत्रकारांकडून माहिती मिळते. पत्रकारांचे हे जाळे फार महत्त्वाचे आहे. या शब्दात पोलिस आयुक्त राकेश ओला यांनी पत्रकारितेचे महत्त्व अधोरेखित केले.

अमरावती श्रमिक पत्रकार संघातर्फे मंगळवारी (दि. ६) पत्रकार दिन व पुरस्कार वितरण सोहळ्यात ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. संघाचे अध्यक्ष गोपाल हरणे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या कार्यक्रमाला मनपा आयुक्त सौम्या शर्मा-चांडक, ज्येष्ठ पत्रकार ॲड. दिलीप एडतकर, विलास मराठे, प्रवीण आहुजा, पोलिस उपायुक्त गणेश शिंदे, श्याम घुगे, श्रमिक पत्रकारांच्या पुरस्कार निवड समितीचे समन्वयक डॉ. विलास नांदुरकर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

प्रास्ताविक पत्रकार संघाचे उपाध्यक्ष मोहन अटाळकर, संचालन शैलेश धुंदी यांनी केले. मांडणी संघाचे कोषाध्यक्ष गिरीश शेरेकर आणि आभार सचिव रवींद्र लाखोडे यांनी मानले. स्वागत संघाचे उपाध्यक्ष अमोल इंगोले, कुष्णा लोखंडे, संतोष ताकपिरे, महेश कथलकर, भैय्या आवारे, वैभव बाबरेकर यांनी केले. यावेळी मान्यवरांनी आपली मते मांडत पत्रकारीतेवर प्रकाश टाकला.

या पत्रकारांचा झाला सन्मान जीवनगौरव पुरस्काराने ज्येष्ठ पत्रकार मनोहर परिमल यांना उपस्थित मान्यवरांच्याहस्ते सन्मानीत करण्यात आले. प्रभावी पत्रकारिता पत्रकार स्वप्नील उमप, उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार प्रवीण कपिले, शोध पत्रकारिता पुरस्कार प्रदीप भाकरे तर लक्षवेधी पत्रकारिता पुरस्कार योगिनी अर्डक यांना देऊन सन्मानित करण्यात आले. प्रत्येकी ११ हजार रुपये रोख, शाल-श्रीफळ आणि सन्मानचिन्ह, असे या पुरस्कारांचे स्वरूप आहे. याचवेळी सुनील धर्माळे व त्यांच्या पत्नी विनिता धर्माळे नुकतेच 'केबीसी' या कार्यक्रमात सहभागी झाले होते. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल या दोघांचा विशेष सन्मान करण्यात आला. याशिवाय राज्य शासनातर्फे दरवर्षी दिल्या जाणाऱ्या लोकनायक बापूजी अणे पुरस्कारासाठी दिव्य मराठीचे ब्युरो चीफ अनुप गाडगे, पत्रकार गजानन मोहोड यांना जाहीर झाल्याबद्दल त्यांचाही सत्कार करण्यात आला.



# रॅगिंग एक अक्षम्य कृत्य

नागपूर येथील शासकीय आयुर्वेदिक कॉलेज आणि रुग्णालयाच्या मुलींच्या वसतिगृहातून द्वितीय वर्षाच्या तब्बल १९ विद्यार्थिनींची रॅगिंग प्रकरणात दोषी ठरल्यानंतर महाविद्यालयाने तीन महिन्यांसाठी हकालपट्टी करण्यात आल्याची वार्ता नुकतीच महाराष्ट्रभर वाऱ्यासारखी पसरली. गेल्या काही दिवसांपासून महाविद्यालयातील प्रथम वर्षाच्या विद्यार्थिनींचा छळ होत असल्याची आणि भीतीचे वातावरण तयार केल्या जात असल्याची तक्रार मिळाल्यानंतर कॉलेजच्या रॅगिंग विरोधी समितीने हा निर्णय घेतला असल्याचे समजते. चौकशीअंती त्यांना वसतिगृहातून तीन महिन्यासाठी बाहेर काढले असले तरी, महाविद्यालयात उपस्थित राहण्याची त्यांना मुभा आहे. त्यामुळे ज्या विद्यार्थिनींनी त्यांची तक्रार केली त्यांना धमकावने किंवा अन्य प्रकारे छळ करण्यात येणारच नाही, हे सध्यातरी सांगता येणारे नाही.

तिथेच दुसरी एक रॅगिंगची घटना गेल्या डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यात बार्शी तालुक्यातील उकडगाव येथील चंद्रभानू सोनवणे महाविद्यालयातील वसतिगृहात घडली. अकरावीत शिकणाऱ्या कॉलेजच्या एका विद्यार्थ्याला वसतिगृहातील तीन विद्यार्थ्यांनी स्टंप, लाकडी काठीने बेदम मारहाण करत रॅगिंग घेतली. जातीवाचक शिवीगाळ करून मानसिक छळ करणाऱ्या त्या तीन विद्यार्थ्यांवर येरमाळा पोलिसांनी गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे. आणि आता नव्या वर्षाच्या अगदी पहिल्याच आठवड्यात हिमाचल प्रदेशातील धर्मशाळा येथील एका शासकीय पदवी महाविद्यालयात एका १९ वर्षीय विद्यार्थिनीचा लैंगिक छळ आणि रॅगिंगमुळे मृत्यू झाल्याची घटना उघडकीस आली आहे. संबंधित विद्यार्थिनीच्या पालकाच्या तक्रारीवरून पोलिसांनी तीन विद्यार्थिनींसह एका प्राध्यापकावर गुन्हा दाखल केला आहे.

वास्तविक देशात रॅगिंग विरोधी कायदा अस्तित्वात असल्याचे ज्ञात असतांना नागपुरातील या विद्यार्थिनीची रॅगिंग करण्यात आली. तर मग, पुढे त्रास देण्यात येणारच नाही. याची हमी वसतिगृह अधिकारी सुद्धा घेतील काय? हा प्रश्न अनुत्तरीतच राहतो. वास्तविक वर उल्लेखित महाविद्यालयांसह अनेक वसतिगृह हे अशा जीवघेण्या रॅगिंगची आश्रयस्थाने झाली आहेत, हेही नाकारता येणारे नाही.

रॅगिंग कायदा म्हणजे शैक्षणिक संस्थांमधील विद्यार्थ्यांना त्रास देणे, धमकावणे किंवा गैरवर्तन करण्यापासून रोखण्यासाठी बनवलेले कायदे, ज्यात महाराष्ट्र रॅगिंग प्रतिबंध कायदा, १९९९ आणि युजीसी नियम यांचा समावेश आहे. या कायद्यांनुसार रॅगिंगमध्ये शारीरिक, मानसिक छळ, अपमान किंवा भीती निर्माण करणे समाविष्ट आहे आणि यासाठी निलंबन, शिक्षा सुद्धा होऊ शकते. तसेच रॅगिंगमुळे आत्महत्या झाल्यास, रॅगिंग करणाऱ्याला आत्महत्येसाठी प्रवृत्त केल्याचा गुन्हा सुद्धा दाखल होऊ शकतो. त्यामुळे अनेक महाविद्यालयांत यासाठी रॅगिंग विरोधी समित्यांची स्थापना केलेली असते. तरीसुद्धा असे प्रकार घडत असतील तर रॅगिंग घेणाऱ्या विद्यार्थ्यांना खरेच सुशिक्षित म्हणायचे काय? कुण्या नवख्याला समज देण्याइतपत संस्कारित समजायचे काय?

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियमांमध्ये म्हटले गेल्यानुसार कुठल्या विद्यार्थ्यास शिवीगाळ, मारहाण, धमकावणे, गैरवर्तन, जबरदस्तीने काहीतरी करायला लावणे, आर्थिक शोषण, लैंगिक शोषण, मानसिक छळ, आत्मविश्वास कमी करणे, तोंडी, लेखी किंवा शारीरिक कृतीतून त्रास देणे, अपमानित करणे, भीती निर्माण करणे म्हणजे रॅगिंग होय.

शेवटी अशी जीवघेणी रॅगिंग घेण्याचे फलित काय? "आमची वरिष्ठांनी रॅगिंग घेतली होती. आम्ही त्यांचे वरिष्ठ आहोत. महाविद्यालयात तसेच वसतिगृहात कसे राहायचे हे शिकवण्यासाठी..." अशी दिलेली कारणे सुसंगत तरी वाटतात काय? या रॅगिंग घेणाऱ्या बिघडेल विद्यार्थ्यांना माझे प्रश्न आहेत. जर एखादा विद्यार्थी ग्रामीण भागातून आला असेल किंवा दुसऱ्या एखाद्या शहरातून आला असेल तर त्याला महाविद्यालयातील किंवा वसतिगृहातील नियम समजावून सांगण्यास अधिकारी, शिक्षक आहेत ना! तुमचं काम शिकण्याचं. मग, त्याकडे लक्ष द्यायचे सोडून नुसत्या अहंकारापोटी तुम्ही उचललेले पाऊल कुणाच्या घरचा आधार हिरावून घेतो, याची साधी कल्पना तरी तुम्हाला असते काय? हेच करण्यासाठी तुम्हाला तुमच्या आई वडिलांनी याठिकाणी पाठवले होते काय? जर ज्याची तुम्ही रॅगिंग घेता त्याठिकाणी तुमचा लहान भाऊ किंवा बहिण असती तर त्यांना तुम्ही असेच छळले असते काय? या रॅगिंगमुळे तुम्ही दुसऱ्या विद्यार्थ्याचेच नव्हे तर स्वतःचेही आयुष्य बर्बाद करता आहात, याची जाणीव तरी तुम्हाला असते काय?

देशात दरवर्षी या रॅगिंगला बळी पडणाऱ्यांची संख्या कमी होण्याऐवजी वाढतच जात आहे. रॅगिंग घेणाऱ्या विद्यार्थ्यांना चौकशीअंती दोषी आढळले तर नुसते काही महिन्यांसाठी निलंबित न करता त्यांना कायमचे निलंबित करून त्यांची रवानगी कारागृहात करायला हवी. यावरच न थांबता त्यांची शैक्षणिक कागदपत्रे सुद्धा रद्द करायला हवीत. फक्त स्वतःची मौज करून घेण्यासाठी रॅगिंग घेणाऱ्या या विद्यार्थ्यांना काय माहित की, यामुळे एखाद्याचे आयुष्यभराचे स्वप्न धुळीस मिळल्या जाते. संबंधित विद्यार्थ्याची मानसिक स्थिती नंतर कशी असते.

२०२५ च्या जुलै महिन्यात पाचगणी येथील एका निवासी शाळेमध्ये दोन मुलांचे त्याच वर्गातील दोन अल्पवयीन मुलांनी रॅगिंग केल्याचा प्रकार घडला होता. नववीतील दोन मुलांनी याच वर्गातील एका मुलाला अर्धनग्न केले. या भीतीने दोन्ही मुले पुण्याला पालकांकडे पळून गेली होती. यात नुकसान कुणाचे झाले? बिचाऱ्या त्या विद्यार्थ्यांच्या मनात तर धास्ती निर्माण झाली होती ना! आणि अर्धनग्न करून त्यांना कुठले नियम सांगण्यात येत होते? कुठली समज देण्यात येत होती?

२२ मे २०१९ रोजी डॉ. पायल तडवी या जळगावच्या आदिवासी डॉक्टर विद्यार्थिनीने तिच्या बरोबर असणाऱ्या अन्य डॉक्टर विद्यार्थिनींनी व तिला शिकवणाऱ्या एका महिला डॉक्टर शिक्षिकेने दिलेल्या त्रासाला कंटाळून आत्महत्या केली अशी तिच्या आईने तक्रार केली होती.

रॅगिंगच्या विरुद्ध महाराष्ट्र शासनाने पंचवीस वर्षांपूर्वी कायदा करूनही व रॅगिंगविरुद्ध समिती आणि अन्य उपाययोजना असतांनाही रॅगिंगच्या घटना विविध व्यावसायिक प्रशिक्षण संस्थांमधून उघडकीस आल्याचे दिसते. जेवढ्या घटना घडतात त्यातील अतिशय थोड्या घटनांबाबत वाच्यता होते व त्यातील फारच थोड्या घटनांमधे कारवाई होते. सर्वोच्च न्यायालयाने सुद्धा या घटनांविरुद्ध वारंवार निर्णय देऊनही व कडक कायदे असूनही या घटना थांबत नाहीत, ही पुरोगामी महाराष्ट्रातील फार मोठी शोकांतिका ठरते. वसतिगृहांत केवळ कॅमेरे लावून रॅगिंगच्या घटना थांबणार नाहीत. त्यासाठी वसतिगृह प्रमुखांनी नव्या विद्यार्थ्यांशी वारंवार संपर्क करून त्यांची विचारपूस करणे गरजेचे आहे.

१८००-१८०-५५२२ या टोल फ्री क्रमांकावर २४ तास तक्रार करता येऊ शकते. हा क्रमांक कॉलेज तसेच वसतिगृहाच्या भिंतीवर जागोजागी लिहायला हवा. त्याआधी हा क्रमांक लागतो की नाही, तेही तपासायला हवे. त्यासोबतच अधिकाऱ्यांचे क्रमांक सुद्धा भिंतीवर लिहायला हवेत. पालकांनी सुद्धा रॅगिंग म्हणजे काय, तसेच रॅगिंग झाल्यास काय कारवाई होऊ शकते, या सगळ्याची माहिती घेऊन विद्यार्थ्यांचे हमीपत्र द्यावे अशी व्यवस्था असावी.

२०२५ च्या एप्रिलमध्ये शिक्षणाचं माहेरघर असलेल्या पुण्यामध्ये ससून रुग्णालयाशी संलग्न बी. जे. मेडिकल कॉलेजमध्ये दोन निवासी डॉक्टरांवर रॅगिंग झाल्याची धक्कादायक माहिती उजेडात आली होती. थेट मंत्रालय स्तरावर विद्यार्थ्यांच्या नातेवाईकांनी तक्रार केल्यानंतर तपासाची चक्रे फिरली आणि खडबडून जागे झालेल्या कॉलेज प्रशासनाने पुढील कारवाई केली होती. पहिल्या वर्षात शिकणाऱ्या एका मुलाला त्याचे दोन वरिष्ठ त्याच्या विभागात डोक्यावरुन कधी गार पाणी ओतून घ्यायला लावायचे तर कधी गरम पाणी ओतून घ्यायला लावायचे. यातून त्या विद्यार्थ्यांत भीती निर्माण झाली होती. मध्यंतरी नवी मुंबईच्या डेंटल कॉलेजमध्ये सुद्धा रॅगिंग प्रकरणी चार विद्यार्थ्यांवर गुन्हा नोंदविण्यात आला होता. विशेष म्हणजे रॅगिंग मध्ये निवासी वसतिगृह आणि वैद्यकीय महाविद्यालये आघाडीवर आहेत, हे सर्व प्रकरणांतून दिसून येते.

मार्च २०२५ मध्ये केरळच्या कोट्टायम येथील एका नर्सिंग होमच्या विद्यार्थ्यांनी घेतलेली रॅगिंग तर केरळ विधानसभेत गाजली होती. या प्रकरणी दोषी पाच विद्यार्थ्यांसह महाविद्यालयाचे प्राचार्य आणि प्रभारी सहाय्यक वार्डन यास सुद्धा निलंबित करण्यात आले होते.

वास्तविक भारतीय समाजातून "एकमेका साहाय्य करू अवघे धरू सुपंथ" ही विचारसरणीच लोप पावत चालली असून ज्याला बघावं तो आपलं प्रस्थ निर्माण करू पाहतो आहे. त्यातून शिक्षणाची मंदिरं सुद्धा सुटू नये, ही मात्र फार चिंतेची बाब आहे. ज्या ज्ञानमंदिरांत समाज घडविण्याचे महत्कार्य केल्या जाते तिथेच अशी विषारी पिलावळ स्वैर फिरत असेल तर कुणाच्या घरचा आधार हिरावण्याआधी यांची नांगी निदान कठोर कायद्याची अंमलबजावणी करून ठेचायला हवी. या अशा समाजविघातक विचारसरणीला जन्म देणाऱ्या मालिका, चित्रपटांवर बंदी घालायला हवी. कारण रॅगिंग एक अक्षम्य कृत्य आहे.

**लीलाधर दवंडे**
कामठी (नागपूर)
८४१२८७७२२०

# पतंगराव नव्हे रॉकेटराव !

महाराष्ट्रातील राजकारणात जवळपास तीस वर्ष आपल्या कर्तुत्वाचा ठसा उमविणारे अजातशत्रू व्यक्तिमत्व असलेले काँग्रेसचे जेष्ठ नेते, महाराष्ट्राचे माजी मंत्री पतंगराव कदम यांची आज ८२ वी जयंती. ८२ वर्षापूर्वी आजच्याच दिवशी म्हणजे ८ जानेवारी १९४४ रोजी पतंगराव कदम यांचा जन्म सांगली जिल्ह्यातील सोनसळ या गावात एका गरीब कुटुंबात झाला.

त्यांचे चौथी पर्यंतचे शिक्षण गावातल्या शाळेत झाले तर सातवी पर्यंतचे शिक्षण शिरसगाव या गावात झाले. ११ वी पर्यंतचे शिक्षण म्हणजे त्या काळातील मॅट्रिक पर्यंतचे शिक्षण त्यांनी कमवा व शिका योजनेअंतर्गत पूर्ण केले. एफ. वाय बी. ए नंतर त्यांनी टीचर्स डिप्लोमा पूर्ण केला व शिक्षक होण्याचे स्वप्न उराशी बांधून पुणे गाठले. पुण्यातील हडपसर येथे दहा बाय दहाच्या पत्र्याच्या खोलीत राहून त्यांनी गोरगरिबांच्या मुलांना शिकवण्याचे काम सुरू केले. शिक्षक असतानाच गोरगरिबांच्या मुलांना उच्च शिक्षण मिळावे यासाठी काही तरी करावे असा विचार त्यांच्या मनात येऊ लागला त्यातूनच , भारती विद्यापीठाची मुहूर्तमेढ रोवली गेली. बा. ग पवार, वसंतराव म्हेत्रे, महादर सर, नीलाखे सर अशा पाच लोकांना घेऊन त्यांनी १० मे १९६४ रोजी भारती विद्यापीठाची स्थापना केली. त्यावेळी त्यांच्या खिशात अवघे ३८ रुपये होते.

हळूहळू भारती विदयापीठाचा विस्तार वाढू लागला. शहराप्रमाणे ग्रामीण भागातही भारती विद्यापीठाच्या पाट्या झळकू लागल्या. भारती विद्यापीठामुळे गोरगरिबांच्या मुलांना इंग्रजीतून शिक्षण मिळू लागले. सर्वसामान्य कुटुंबातील मुले उच्च शिक्षण घेऊ लागली. त्यांनी लावलेल्या भारती विद्यापीठाच्या रोपट्याचे आज वटवृक्ष बनले आहे. के.जी ते पी.जे असे सर्वप्रकारचे शिक्षण आज भारती विद्यापीठातून मिळत आहे. शैक्षणिक क्षेत्रात त्यांनी केलेले कार्य महान असेच आहे.

भारती विद्यापीठाचा पसारा सांभाळीत त्यांनी राजकारणातही ठसा उमटविला. १९६८ साली एस टी महामंडळाच्या सदस्यपदी त्यांची निवड झाली. गाव तिथे एस टी ही योजना राबवून त्यांनी गावागावात एस टी पोहचवली. १९८५ साली त्यांनी अपक्ष म्हणून विधानसभेची निवडणूक लढवली. त्यात ते विजयी झाले. १९९० सालच्या विधानसभा निवडणुकीत त्यांना काँग्रेसने त्यांना तिकीट दिले तेंव्हापासून १९९५ सालचा अपवाद वगळता ते सतत निवडून आले. २०१४ साली मोदी लाटेत अनेक दिग्गज नेत्यांचा पराभव झाला पण त्यांनी आपला गड राखला. या दरम्यान त्यांनी शिक्षण, सहकार, उद्योग, महसूल, वन या महत्वाच्या खात्याची मंत्रीपदे सांभाळली. इतकी वर्ष मंत्रीपदावर राहूनही त्यांच्यावर एकही आरोप झाला नाही यातच त्यांचा कारभार किती पारदर्शक होता, हे दिसून येते.

काँग्रेस पक्षावर त्यांची नितांत श्रद्धा होती. सत्ता असो वा नसो काँग्रेस पक्षाशी ते कायम एकनिष्ठ राहिले. प्रत्येकवेळी मुख्यमंत्र्यांच्या स्पर्धेत त्यांचे नाव कायम चर्चेत असायचे, पण दुर्दैवाने ते मुख्यमंत्री बनू शकले नाही. तरीही त्यांनी याबाबत कधीही जाहीर नाराजी व्यक्त केली नाही. पक्ष सोडण्याचा विचारही त्यांच्या मनात कधी आला नाही. आजच्या आयाराम गयाराम संस्कृतीत पतंगरावांची निष्ठा उठून दिसते. पतंगराव तरुण पिढीसाठी मार्गदर्शक आहेत.

बेधडक आणि मनमोकळा स्वभाव हे त्यांचे वैशिष्ट्य होते. ओठात एक आणि पोटात एक असे पतंगरावांच्या बाबतीत कधीच झाले नाही. खऱ्याला खरे आणि खोट्याला खोटे म्हणण्याची त्यांची वृत्ती राजकारणात अभावानेच पाहायला मिळते. त्यांचे भाषण म्हणजे पर्वणीच. त्यांच्या भाषणात गावाकडचा रांगडेपणा असायचा. कार्यकर्त्यांचा गराडा कायम त्यांच्यासोबत असायचा. उद्घाटनाच्या कार्यक्रमाला पतंगरावांनाच बोलवायचे असा कार्यकर्त्यांचा आग्रह असायचा.

त्यांच्या कामाचा धडाका देखील जबरदस्त असायचा. आपल्या मतदारसंघात त्यांनी कामाचा डोंगर उभा केला होता. आपल्या मतदारसंघात एमआयडीसी उभारून त्यांनी अनेक उद्योगधंदे आणले. सूत गिरण्या, साखर कारखाने, वाईन पार्क, भारती विद्यापीठ, भारती हॉस्पिटल उभारून मोठ्या प्रमाणात उद्योग निर्मिती केली. त्यांच्या कामाचा झपाटा इतका असायचा की, एकदा पु. ल. देशपांडे म्हणाले की, हे पतंगराव नव्हेत तर रॉकेटराव आहेत.

पतंगराव कदम यांनी सहकार क्षेत्रातही आपला ठसा उमटविला. ९ मार्च २०१८ रोजी पतंगराव कदम यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने महाराष्ट्रातील एक असामान्य व्यक्तिमत्व काळाच्या पडदयाआड गेले. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राची मोठी हानी झाली. पतंगराव कदम यांना ८२ व्या जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे

# सद्गुरु नाथा हात जोडीतो अंत नको पाहू ।

श्री स्वामी समर्थ सेवा व अध्यात्मिक विकास मार्ग दिंडोरी प्रणित नित्यसेवा या पुस्तकांमधील श्री सद्गुरू प्रार्थना ही , भक्त आणि सद्गुरु यांच्यामधील संवाद आहे. भक्त हा आपल्या सद्गुरुकडे आर्त भावनेने प्रार्थना करीत आपल्या मनातील भाव प्रगट करतो. सद्गुरु म्हणजे शिष्याची पात्रता आणि अधिकार वाढल्यानंतर जे परमात्म्याची प्राप्ती करून देतात ते सद्गुरु. सोप्या भाषेमध्ये असे म्हणता येईल की, सुयोग्य मार्ग दाखवणारा महात्मा म्हणजे सद्गुरू.

सद्गुरुकडे प्रार्थना करतांना भक्ताने सद्गुरु समर्थ महाराजश्री यांना हात जोडलेले असून आर्त भावनेने अंत पाहू नका, अशी प्रार्थना केली आहे. प्रस्तुत प्रार्थनेमध्ये 'सद्गुरु नाथा' असा शब्दप्रयोग भक्तांनी केला आहे.

सद्गुरु हेच आपल्यासाठी नाथ आहेत. सद्गुरु हेच आपले तारणहार आहेत, याची जाणीव भक्ताला झाल्यामुळे , भक्तांनी सद्गुरुला नाथ म्हटले आहे. भक्त सद्गुरुला म्हणतो की, माझ्या मनामध्ये सुरू असलेला संवाद हा मला मुक्तपणे व्यक्त करायचा आहे. परंतु , हे ! सद्गुरु , माझ्या मनाचे हे सर्व हितगुज आणि संवाद हा तुमच्याशिवाय कुणाला सांगू ? असा प्रश्न भक्तांनी सद्गुरुला प्रार्थनेच्या धृपदामध्ये केलेला आहे...

सद्गुरु नाथा हात जोडीतो अंत नको पाहू I
ऊकलुनी मनीचे हितगुज सारे वद कवणा दावू IIधृ II

आपल्या सर्वांच्या मनामध्ये विविध विचाराचे काहूर निर्माण झालेले असते. परंतु , मनामधील हे विचार कुणासमोर व्यक्त करावे ? असा प्रश्न आजच्या युगामध्ये प्रत्येकासमोर पडलेला आहे . याचे कारण असे आहे की, सध्याच्या स्वार्थी युगामध्ये भावनेची कदर न करता, भावनेच्या आधारे ब्लॅकमेल करण्याचे प्रकार स्वहितासाठी करताना अनेकजण पहावयास मिळतात. अशामध्ये आपल्या मनीचे हितगुज बोलून दाखवण्यासाठी योग्य असे ठिकाण म्हणजे सद्गुरु आहेत.

अशा या सद्गुरुला भक्त आर्त भावनेने दोन्ही हात जोडून प्रार्थना करतात. कारण, भक्ताला माहित आहे की, आपल्या हितासाठी रात्रंदिवस श्रम घेणारे फक्त आपले सद्गुरू श्री स्वामी समर्थ महाराजश्री आहेत.

असे असताना सुद्धा, भक्त म्हणतो की, मी तुम्हाला किती त्रास देऊ ? मला माहित आहे की, तूम्ही माझ्या हृदयामध्ये वसलेला आहात. असे असले तरीही, तुम्ही मला दिसत नाही. तेव्हा तुम्हाला कसे पाहू ? असा प्रश्न भक्तांनी सद्गुरु श्री स्वामी समर्थ महाराजश्री यांना प्रार्थनेच्या पहिल्या कडव्यामधून विचारलेला आहे.

निशीदिनी श्रमसी मम हितार्थ तू किती तुज शीण देऊ I
हृदयी वससी परी नच दिससी कैसे तुज पाहू II१II

भक्ताच्या मनाचा मनाशी चाललेला संवाद भक्त सद्गुरुला बोलतोय.भक्ताला जाणीव आहे की, सद्गुरु हे रात्रंदिवस भक्ताच्या हितासाठी श्रम करतात.

तेव्हा हे सद्गुरु ! आम्ही आमचं संपूर्ण शरीर जरी तुम्हास अर्पण केले तरीही तुमच्या उपकाराची परतफेड होणार नाही. हे सद्गुरु ! तुम्ही आमच्या मनामध्ये नश्वर गोष्टीविषयी वाटणारी भीती याची जाणीव करून देता. नाशिवंत गोष्टीविषयीची मनामध्ये निर्माण झालेली भीती आपण आमच्या मनामधून त्या ,नश्वर असल्याची जाणीव करून मनातून काढून टाकता. सद्गुरूंनी भक्तावर केलेल्या उपकाराची परतफेड करता येत नाही. याविषयी भक्ताला जाणीव करून देणाऱ्या प्रार्थनेच्या दुसऱ्या कडव्यामधील पुढील ओळी आहेत...

उत्तीर्ण नव्हे तुज उपकारा जरी तनु तुज वाहू I
बोधुनि दाविसी इहपर नश्वर मनी उठला बाऊ II२ II

अनेक जन्मानंतर मनुष्य जन्म प्राप्त होतो , असे म्हणतात. त्यामुळे भक्त सद्गुरुला म्हणतो की, मी कोण आहे ? कुठला आहे ? माझे कार्य काय ? याची कोणतीही जाणीव मला नाही. त्यामुळे या जगामध्ये नेमकं मी कसा राहतो ? असा प्रश्न भक्ताने सद्गुरु श्री स्वामी समर्थ महाराजश्रींना विचारला आहे. अशाप्रकारे माझ्या मनाची द्विधा अवस्था झालेली आहे.

तेव्हा हे सद्गुरु माझ्या मनामध्ये असलेली भीती नष्ट करून माझं मन निश्चल करा. मला निश्चल करण्यासोबत सर्वांकडे समतेच्या दृष्टीने पाहण्यासाठी माझ्यावर कृपादृष्टी करा. सद्गुरूच्या कृपाप्रसादाचे जर, आपल्याला लाभार्थी व्हायचे असेल तर, गरीब ,श्रीमंत , श्रेष्ठ आणि कनिष्ठ असा कोणताही भाव आपल्या मनामध्ये न ठेवता सर्वांप्रती समभाव जर ,आपण ठेवला तर, आपण सद्गुरु श्री स्वामी समर्थ महाराजश्रींच्या कृपेस आपण पात्र ठरू शकतो. असाच काहीसा भाव प्रार्थनेच्या तिसऱ्या कडव्यामध्ये व्यक्त झालेला आहे...

कोण कुठील मी कवण कार्य मम जनी कैसा राहू I
करी मज ऐसा निर्भय निश्चल सम सकला पाहू II३II

भक्त हा सद्गुरुला म्हणतो की, जाण नसलेले म्हणजे बुद्धीहीन असे माझे मन आहे. त्यामध्ये भक्ती मार्गाकडे आणि तुझ्या मार्गाकडे येण्याचा त्याचा वेग अतिशय सावकाश आहे. इतकेच नाही तर , माझे मन भ्रमित असून त्याची ही तळमळ कशी सहन करू ? या भ्रमित , बुद्धीहीन आणि अजान मनामुळे निर्माण झालेली माया दूर करून आपण मला अनुभव द्यावा. आपण माझी प्रचिती पाहू नका,असा भाव भक्ताने प्रार्थनेच्या शेवटच्या कडव्यात व्यक्त केला आहे...

अजाण हतबल भ्रमीत
मनिची तळमळ कशी साहू I
निरसूनी माया दावी अनुभव प्रचिती नको पाहू II ४ II

थोडक्यात, भक्ताने सद्गुरु श्री स्वामी समर्थ महाराजश्री यांना प्रार्थना केली असून , त्यामध्ये मनाला भक्तिमार्गाला लावण्याची इच्छा व्यक्त केली आहे. मानवी मनाला योग्य मार्ग आणि योग्य गती देण्याचे काम सद्गुरु करतात, त्यामुळे भक्तांनी अंतःकरणपूर्वक प्रार्थना केली आहे. भक्त आणि सद्गुरु यांच्यामधील संवाद हा आई आणि लेकरासारखा वाटतो. त्यांच्या संवादामध्ये कुठल्याही प्रकारची औपचारिकता नाही. व्यक्त होतांना कोणतेच बंधन नाही... आणि कुठलीही भीती नाही. भक्ताचे मन हे सद्गुरु चरणी लीन झाले आहे.

**भगवान राईतकर**
विवेकानंद नगर, मेहकर

# संत नामदेव महाराजांच्या अभंगातून प्रबोधन

संत नामदेव म्हणजे त्यावेळच्या संतांपैकी वयस्क संत होते. कदाचित म्हणूनच संत वाङ्मयाच्या इतिहास मध्ये नामदेवांचं साहित्य सुरुवातीला येते. संत नामदेव महाराज यांचा जन्म हिंगोली जिल्हा मध्ये नरसी या गावात 26 आक्टोम्बरं 1270 मध्ये झाला.त्यांचे वडील दामा, आणि आईचे नाव गोणाई होते, जातीने ते शिंपी होते, ते नेहमी म्हणत शिंपीयाच्या कुळी जन्म माझा झाला|| परी जीव गुंतला सदाशिवी ||.

संत नामदेव हे अगदी लहान पणापासूनच विठ्ठलाचे भक्त होते. त्यांचे सर्व कुटुंब पंढरपूर येथे राहत होते, त्यांचे आई वडील रोज पांडुरंगाला नैवेद्य घेऊन मंदिरात जात असत, तो नैवेद्य घरी नेऊन प्रसाद म्हणून खात असत.

नामदेव महाराज हे रोजच पाहत असत, आईला म्हणत की पांडुरंगाला नैवेद्य मी नेत जाईल, पण आई म्हणायची मोठा झाल्यावर नेत जा, तेव्हा दुसऱ्या दिवशी नामदेव म्हणत मी आज मोठा झालो मी पांडुरंगाला जेवू घालणार, तिसऱ्या दिवशी परत म्हणायचे मी आज नक्की मोठा झालो असेल असं करत बरेच दिवस झाले, एकदा त्यांच्या आई वडिलांना बाहेरगावी जाण्याचे काम पडले, आणि पांडुरंगाला नैवेद्य न्यायची वेळ नामदेव महाराज वर आली, खूप आनंद झाला त्यांना, आणि खिरीचा नैवेद्य घेऊन ते विठ्ठल मंदिरात आले, खीर देवासमोर ठेवली आणि खा म्हणून सांगितले, पण पाषाणाचा देव तो कसा खाणार, पण नामदेव खूप हट्टी स्वभावाचे होते, ते म्हणाले जोवर देव खाणार नाही मी सुद्धा जेवणार नाही, खूप वेळ वाटत पाहत होते काहीही झालं तरी मी हट्ट सोडणार नाही असे तर देवाशी भांडू लागले.

शेवटी नामदेव महाराज यांनी बाजूला असलेला एक दगड हातात घेतला आणि विठ्ठलाला सांगितले की तु जर खीर खाल्ली नाहीस तर हा दगड मी माझ्या डोक्यात घालून घेईल,

मग काय नामदेवांचा भोळा भाव पाहून पांडुरंग परमात्मा माणसाच्या रूपात प्रगट झाले आणि खीर खाल्ली, देवाला निर्गुण रूपातून सगुण रूपात आणण्याची शक्ती एका खऱ्या भक्तात असते. तेच नामदेव महाराजांनी जगाला दाखवून दिले, विठ्ठल परमात्मा रोजच मग नामदेव महाराज सोबत संभाषण करू लागले आणि त्यांनी आणलेला नैवेद्य खाऊ लागले हळूहळू ही वार्ता सगळीकडे पसरायला लागली,

प्रत्यक्षात देव मानवी रूपात येऊन जेवला, हा एक चमत्कारच होता, आणि असे बरेच चमत्कार पुढे नामदेव महाराज यांच्या आयुष्यात घडले, ते पांडुरंगाचे लाडके भक्त होते,त्यांनी अनन्य प्रकारचे अभंग रचले, त्यांचे अभंग हे विठ्ठल भक्ती, अध्यात्म नामाचा महिमा याचा संदेश देणारे आहेत. त्यांनी आपल्या अभंगातून देवाची भक्ती, ईश्वरा प्रति प्रेम, समर्पण भावना, नामस्मरण करण्याचे महत्व सांगितले आहे. नामदेवांचे अभंग हे माणसाला देवाच्या नामात, देवाच्या सेवेत तल्लीन होण्यासाठी प्रेरित करतात.

पाषाणाचे टाळ पाषाणाचा देव
घास घेई विठ्ठला बोले नामदेव
देवा पांडुरंगा माझ्या जिवलगा
का रुसला सांग माझ्यावरी देव
तूच माझा सखा जगी पाठीराखा
माझे मीच झालो पाषाणाचे देव
घास घे रे पांडुरंगा बोलें नामदेव,

या अभांगात नामदेव विठ्ठलाला विचारतात की हे जिवलगा तु माझ्यावर रुसला आहेस का? तूच माझा आधार आहेस, तूच माझा सखा आहेस, तूच जगाचा पाठीराखा आहेस, तु घास घे रे पांडुरंगा, निर्गुण रूपात असण्याऱ्या दगडाच्या देवाला नामदेव महाराजांनी सगुण रूपात यायला भाग पाडलं, यावरून ते किती उच्च कोटीचे संत होते, हे आपल्या लक्षात येते.

आपल्या अभंगातून त्यांनी वेळेचं महत्व सांगितलं की एकही क्षण वाया घालू नका. अवघे सावधान होऊन

विचारा | सोडवण करा
संसाराची || अवघा
काळ वाचे म्हणा नारायण |
वाया एक क्षण जाऊं नेदा ||

प्रत्येक श्वासाला, प्रत्येक क्षणाला तुम्ही देवाचं नाम ओठावर ठेवा त्यामुळे तुमची दुःख रुपी संसारातून मुक्तता होईल. तेव्हा सावध होऊन सर्वांनी विचार केला पाहिजे2

दिव्य वतन हे दैनिक वृत्तपत्र प्रकाशक मालक मुख्य संपादक गोपाल आनंदराव कडुकर यांनी कार्यालय हाऊस नंबर १८ निवास सोसायटी स्वामी समर्थ मंदिर जवळ घोगली रोड बेसा तालुका जिल्हा नागपूर - ४४००३४ येथून प्रकाशित केले. संपर्क मो. ७७०९३७७५१०

## महत्त्वाचे...



### एकाच वेळी मतमोजणी करा, उमेदवारांना ताटकळत ठेवू नका

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आता मतमोजणी प्रक्रियेवरून नव्या वादाला तोंड फुटण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. मुंबईसारख्या देशातील सर्वात मोठ्या महानगरपालिकेच्या निवडणुकीचे निकाल वेळेत आणि पारदर्शक पद्धतीने जाहीर होणे अत्यंत महत्त्वाचे असताना, यंदा अवलंबण्यात येणाऱ्या मतमोजणीच्या कार्यपद्धतीबाबत गंभीर प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस अॅड. संदेश कोंडविलकर यांनी राज्य निवडणूक आयोगाचे आयुक्त सुरेश काकणी यांना यासंदर्भात सविस्तर पत्र लिहून तीव्र चिंता व्यक्त केली आहे. मुंबई महापालिकेतील सर्व प्रभागांची मतमोजणी एकाच वेळी सुरू करावी, अशी ठाम मागणी त्यांनी या पत्रातून केली आहे.काँग्रेसने आपल्या पत्रात नमूद केल्याप्रमाणे, बृहन्मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी यंदा 23 निवडणूक निर्णय अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत. प्रत्येक निर्णय अधिकाऱ्याच्या कार्यक्षेत्रात साधारणतः 8 प्रभागांचा समावेश आहे.

### अशोक चव्हाणांच्या मनात जरा तरी लाज राहिलीय का?



नांदेड - महानगरपालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या सभेत काँग्रेसच्या ७० वर्षांच्या कारभारावर टीका केली. मात्र, या टीकेवरून आता काँग्रेसने माजी मुख्यमंत्री आणि भाजप नेते अशोक चव्हाण यांना लक्ष्य केले आहे. "फडणवीस तुमच्या वडिलांच्या कामावर टीका करत असताना तुम्ही गप्प कसे बसलात? मनातली लाज फडणवीसांच्या चरणी गहाण ठेवलीय का?" अशा अत्यंत तिखट शब्दांत काँग्रेस नेते हर्षवर्धन सपकाळ यांनी अशोक चव्हाणांवर हल्लाबोल केला आहे.सोमवारी नांदेड येथील इंदिरा गांधी मैदानावर देवेंद्र फडणवीस यांची जाहीर सभा पार पडली. यावेळी बोलताना त्यांनी काँग्रेसवर जोरदार निशाणा साधला. "गेल्या ७० वर्षांत राज्यकर्त्यांना शहरांच्या विकासाचा विसर पडला होता. मात्र, २०१४ मध्ये नरेंद्र मोदी पंतप्रधान झाल्यानंतर त्यांनी स्मार्ट सिटी, पंतप्रधान आवास योजना आणि अमृत योजनेच्या माध्यमातून हजारो कोटींचा निधी शहरांना दिला," असे फडणवीस म्हणाले होते. आता या टीकेवर काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी प्रत्युत्तर देत थेट माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांच्यावरही निशाणा साधला.

देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या या टीकेनंतर हर्षवर्धन सपकाळ यांनी अशोक चव्हाण यांच्या भूमिकेवर बोट ठेवले. अशोक चव्हाणांच्या मनात जरा तरी लाज राहिलीय का की तीही देवेंद्र फडणवीस चरणी गहाण ठेवलीय? असा सवाल काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे.

# उमेदवारांना धमकावल्याचे आरोप हास्यास्पद

## उमेदवारी मागे घेण्यासाठी 5-5 कोटी मागण्याचे प्रयत्न, व्हायरल व्हिडिओवर राहुल नार्वेकरांचे भाष्य

दिव्य वतन /वृत्तसेवा

मुंबई-कुलाबा वॉर्डातील उमेदवारी अर्जावरून निर्माण झालेल्या वादानंतर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी आपली भूमिका स्पष्ट करत विरोधकांचे सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. "हा केवळ राजकीयदृष्ट्या प्रेरित 'फेक नॅरेटिव्ह' सेट करण्याचा प्रयत्न आहे," असे म्हणत त्यांनी ठाकरे गटावर पलटवार केला आहे. ज्या महिलेने दबाव टाकल्याचा आरोप केला आहे, तिला आपण कधी पाहिले नाही किंवा भेटलोही नाही. उमेदवारी मागे घेण्यासाठी 5-5 कोटी रुपये मागण्याचे ह्या लोकांनी प्रयत्न केले होते, असा आरोपही राहुल नार्वेकर यांनी केला.

विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी उमेदवारी अर्ज भरण्याच्या प्रक्रियेदरम्यान पोलिसांवर दबाव टाकर उमेदवारांवर दमदाटी केल्याचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर राजकीय वर्तुळात खळबळ उडाली होती. या प्रकरणावरून शिवसेना खासदार संजय राऊत आणि अरविंद सावंत यांनी नार्वेकरांवर गंभीर आरोप केले होते, तर शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी त्यांच्या निलंबनाची मागणी केली आहे. यासंदर्भात कुलाबा मतदारसंघातील काही इच्छुक उमेदवारांनी न्यायालयात याचिका दाखल केली आहे. आता या सर्व प्रकरणावर राहुल नार्वेकर यांनी भाष्य केले आहे.

उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत २ जानेवारीला संपली असताना ७ जानेवारीला हे आरोप का केले जात आहेत, असा सवाल नार्वेकरांनी विचारला. "उमेदवारी मागे घेण्याची तारीख उलटून ५ दिवस झाले आहेत. या पाच दिवसांत हे लोक झोपले होते का? की काही विशेष प्लॅनिंग सुरू होते? हे सर्व राजकारण डोळ्यासमोर ठेवून रचलेले नाटक आहे," असे विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर म्हणाले.नार्वेकर यांनी आरोप करणाऱ्या दीपक पवार यांच्यावरच उलटतपासणी केली. "मी या व्यक्तीची माहिती घेतली आहे. निवडणुकीत उमेदवारी अर्ज भरून नंतर पैसे उकळण्यासाठी उमेदवारांना धमकावणे, हाच यांचा धंदा आहे. लोकसभेतही त्यांच्यावर असेच आरोप होते. ५-५ कोटी रुपये मागण्याचे प्रकार या लोकांकडून झाले असून, त्याबाबत आम्ही लेखी तक्रार आणि खुलासा करणार आहोत," असा इशारा नार्वेकरांनी दिला.राहुल नार्वेकरांनी अर्ज मागे घेण्यासाठी उमेदवारांना धमकावल्याचा आरोप करण्यात आला आहे. यावरही त्यांनी स्पष्टीकरण दिले. "विधानसभा निवडणुकीत मला ५० हजार मतांचे मताधिक्य आहे. वॉर्ड २२५, २२६ आणि २२७ मधूनही मला हजारो मतांची आघाडी मिळाली आहे. ज्याच्या पाठीशी एवढे जनबळ आहे, त्याला कोणाला धमकावण्याची गरज काय? विरोधकांकडे उमेदवार उभे करायला माणसे नाहीत, म्हणून ते असले घाणेरडे प्रकार करत आहेत," असे स्पष्टीकरण राहुल नार्वेकर यांनी दिले.राहुल नार्वेकर यांच्या कुटुंबातील तीन सदस्य हर्षिता शिवलकर (मेहुणी), मकरंद नार्वेकर (भाऊ) आणि गौरी नार्वेकर (बहीण) हे कुलाब्यातील तीन वेगवेगळ्या वॉर्डातून निवडणूक लढवत आहेत. राहुल नार्वेकर यांनी आपल्या पदाचा गैरवापर करून पोलीस यंत्रणेवर दबाव आणला आणि इतर उमेदवारांना निवडणूक कार्यालयातून बाहेर काढले, असा आरोप करत न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे. यावरही त्यांनी प्रतिक्रिया दिली. "कोर्टात जाणे हा प्रत्येकाचा अधिकार आहे, पण कोर्टाने या प्रकरणात तातडीने सुनावणी घेण्यास नकार दिला आहे. मी कायद्याचा अभ्यासक आहे आणि संविधानाचे रक्षण करण्याचे काम मी सभागृहात व बाहेरही करत आलो आहे," असे ते म्हणालेत. दुसरीकडे, शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेत राहुल नार्वेकर यांच्या निलंबनाची मागणी केली आहे.

तर खासदार संजय राऊत यांनी नार्वेकरांनी पोलीस यंत्रणेचा गैरवापर केल्याचा व्हिडिओ शेअर करत त्यांच्यावर तोफ डागली होती. एका बाजूला विरोधकांचे गंभीर आरोप आणि दुसरीकडे राहुल नार्वेकरांचा आक्रमक बचाव, यामुळे कुलाब्यातील निवडणुकीला आता कायदेशीर आणि राजकीय संघर्षाचे स्वरूप प्राप्त झाले आहे.



# विलासराव देशमुख महाराष्ट्राचे महत्त्वाचे नेतृत्व

## रवींद्र चव्हाणांचे वक्तव्य अनावधानाने, देवेंद्र फडणवीसांकडून लातुरात डॅमेज कंट्रोल

दिव्य वतन /वृत्तसेवा

मुंबई-"आमची राजकीय लढाई काँग्रेस पक्षाशी असली, तरी दिवंगत विलासराव देशमुख यांच्याबद्दल आमच्या मनात नितांत आदर आहे. महाराष्ट्राच्या जडणघडणीत ज्यांचा मोलाचा वाटा आहे, अशा नेत्यांमध्ये विलासरावांचे नाव प्रमुख आहे, हे सांगताना मला कोणताही संकोच वाटत नाही," अशा शब्दांत राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लातूरमध्ये भावनिक साद घातली. भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी विलासरावांबद्दल केलेल्या वादग्रस्त विधानावरून निर्माण झालेला तणाव निवळण्यासाठी देवेंद्र फडणवीस यांनी लातुरात 'डॅमेज कंट्रोल' केल्याचे दिसून आले.

महाराष्ट्राचे दिवंगत माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या आठवणी लातूरमधून पुसल्या जातील, असे वादग्रस्त वक्तव्य भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी केल्यानंतर राज्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली. या वक्तव्यामुळे लातूरसह संपूर्ण मराठवाड्यात तीव्र प्रतिक्रिया उमटत असून, काँग्रेस कार्यकर्ते आणि विलासराव देशमुखांवर प्रेम करणाऱ्या नागरिकांमध्ये संतापाची लाट पसरली. मुद्दा अधिक तापण्याची शक्यता पाहता रवींद्र चव्हाण यांची आपल्या विधानावरून दिलगिरी देखील व्यक्त केली. मात्र, रवींद्र चव्हाण यांच्या निषेधार्थ विविध संघटनांच्या वतीने बुधवारी लातूर बंदची हाक देण्यात आली होती.

लातूरमध्ये आयोजित एका सभेत बोलताना फडणवीस यांनी लातूरच्या राजकीय वारशाचा गौरव केला. "लातूर अशी भूमी आहे की जिने महाराष्ट्राला मोठ्या प्रमाणात नेतृत्व दिले. चाकूर साहेबांचे एकूण



राजकीय आयुष्य बघितले, तर नगराध्यक्षपासून ते लोकसभेच्या अध्यक्षापर्यंत आणि महाराष्ट्रातील मंत्रीपदापासून देशाच्या गृहमंत्रीपदापर्यंत त्यांनी कारभार चालवला. राजकारणात अशाप्रकारचे लोक आपल्याला विरळ दिसतात. त्याचप्रमाणे शिवाजीराव पाटील निलंगेकर यांसह लातूरला वेगळी ओळख देणारे माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख हे नाव पक्षाच्या पलिकडे आहे. महाराष्ट्राचा जडणघडणीत मोलाचा वाटा आहे म्हणून आपण ज्या नेत्यांचा आदर करतो, त्यातील प्रमुख नाव विलासराव देशमुख यांचे आहे, असे सांगताना म[illegible]ाही संकोच नाही" [illegible]वेंद्र फडणवीस म्हणाले.

रवींद्र चव्हाण यांनी विलासराव देशमुख यांच्याबद्दल केलेल्या विधानावरही स्पष्टीकरण दिले. "दोन दिवसांपूर्वी काही गोंधळ झाला. आमच्या अध्यक्ष बोलत असताना, त्यांना सांगायचे होते की, राजकीयदृष्ट्या आपल्याला नवीन रेकॉर्ड तयार करायचा आहे. पण कदाचित त्यांचे शब्द चुकीच्या पद्धतीने गेले असतील, त्याबाबत त्यांनी दिलगिरीही व्यक्त केली आहे. मी जाहीरपणे सांगतो काँग्रेस पक्षाशी आमची लढाई असली, तरी विलासराव देशमुखांबद्दल आम्हाला नितांत आदर आहे. ते या महाराष्ट्रातील महत्त्वाचे नेतृत्व आहेत", असे म्हणत देवेंद्र फडणवीस यांनी लातुरात डॅमेज कंट्रोल करण्याचा प्रयत्न केला.


# तुला कुलाब्यात राहायचंय की नाही ?

## मी बोलावल्यावर मुख्यमंत्रीही येतात, विधानसभा अध्यक्ष नार्वेकरांवर उमेदवाराला धमकावल्याचा आरोप

दिव्य वतन /वृत्तसेवा

मुंबई-विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्यावर कुलाबा वॉर्ड क्र. २२६ मधील उमेदवार तेजल पवार आणि त्यांचे पती दीपक पवार यांनी धमकी आणि दडपशाहीचा गंभीर आरोप केला आहे. नार्वेकर यांनी दीपक पवार यांना"मी बोलावल्यावर मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनाही यावं लागतं, तुला कुलाब्यात राहायचंय की नाही, ते तू ठरव," अशी थेट धमकी दिल्याचे पवार दाम्पत्याने पत्रकार परिषदेत सांगितले. उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी आधी लाखो, नंतर कोट्यवधी रुपयांची ऑफर दिली गेली, असा दावाही त्यांनी केला. बुधवारी 'शिवसेना भवन' येथे ठाकरे गटाचे खासदार अरविंद सावंत यांच्या उपस्थितीत घेतलेल्या पत्रकार परिषदेत पवार दाम्पत्याने हा थरारक घटनाक्रम मांडला.

तेजल पवार यांनी ३० डिसेंबरला आपला उमेदवारी



अर्ज दाखल केला होता. यानंतर राहुल नार्वेकर यांनी दीपक पवार यांना आपल्या गाडीतून कार्यालयात नेले आणि उमेदवारी मागे घेण्यासाठी दबाव टाकण्यास सुरुवात केली.

दीपक पवार यांनी घडलेला प्रसंग सांगताना म्हटले, "राहुल नार्वेकर मला म्हणाले, 'मी कुठल्या पदावर आहे तुला माहिती नाही का? मी बोलावल्यावर मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्रीही येतात.' त्यांनी मला 'राजू' नावाच्या कार्यकर्त्याचे उदाहरण दिले. राजूने निवडणूक लढवण्याची घोषणा करताच त्याच्यावर अनेक गुन्हे दाखल करण्यात आले होते. 'तुला कुलाब्यात राहायचंय की नाही, हे तूच ठरव,' अशी धमकी त्यांनी दिली. त्यांचे हे शब्द ऐकून मी प्रचंड घाबरलो होतो."

राहुल नार्वेकर आणि त्यांच्या स्वीय सहाय्यकाकडून (PA) वारंवार फोन करून आणि घरी येऊन दबाव टाकण्यात आल्याचे तेजल पवार यांनी सांगितले. "माझे पती घरी आले तेव्हा नार्वेकरांचा पीए त्यांच्यासोबत होता. त्याने आम्हाला अर्जाची माघार घेण्यासाठी पैशांची ऑफर दिली. सुरुवातीला ही रक्कम लाखोंमध्ये होती, मात्र नंतर ती वाढवून कोट्यवधी रुपये करण्यात आली. दुसऱ्या दिवशी पुन्हा पीए घरी आला, पण आम्ही घाबरून दरवाजाच उघडला नाही," असे तेजल पवार म्हणाल्या.स्वतःच्या पक्षानेही साथ सोडल्याने आणि नार्वेकरांकडून होणाऱ्या सततच्या दबावामुळे पवार कुटुंब भयभीत झाले होते. "नार्वेकरांच्या धमकीनंतर आम्ही इतके घाबरलो होतो की, आम्ही दोघांनी फोन बंद केले आणि घरातून निघून गेलो.

# अंबरनाथ मधील ब्लॉक कमिटी अध्यक्षांसह नगरसेवकांचे काँग्रेसकडून निलंबन

दिव्य वतन /वृत्तसेवा

मुंबई-महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीने अंबरनाथ नगरपालिकेतील घडामोडींवर कठोर भूमिका घेत पक्षशिस्तीचा मोठा निर्णय घेतला आहे. अंबरनाथ नगरपालिकेच्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाच्या चिन्हावर उमेदवार लढवून निवडून आले असतानाही भाजपच्या सदस्यांसोबत गटबंधन केल्याचा ठपका ठेवत प्रदेश काँग्रेसने थेट कारवाईचा इशारा दिला आहे. या प्रकरणी अंबरनाथ ब्लॉक काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्रदीप पाटील यांना कारणे दाखवा नोटीस देत काँग्रेस पक्षातून निलंबित करण्याचा निर्णय कळवण्यात



आला आहे. हा निर्णय प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या आदेशानुसार घेण्यात आल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

प्रदेश काँग्रेस कमिटीच्या अधिकृत पत्रानुसार, अंबरनाथ नगरपालिकेच्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाने अधिकृतपणे निवडणूक लढवली होती. या निवडणुकीत काँग्रेसच्या चिन्हावर लढलेले बारा नगरसेवक निवडून आले. मात्र, पक्षाच्या प्रदेश कार्यालयास कोणतीही माहिती न देता या नगरपालिकेत भारतीय जनता पक्षाच्या सदस्यांसोबत गटबंधन करण्यात आल्याचे प्रसारमाध्यमांतून समोर आले. ही बाब अत्यंत गंभीर, चुकीची आणि पक्षशिस्तीचा भंग करणारी असल्याचे प्रदेश काँग्रेसने स्पष्ट शब्दांत नमूद केले आहे.काँग्रेसच्या पत्रात असेही नमूद करण्यात आले आहे की, स्थानिक पातळीवर कोणतेही आघाडी किंवा गटबंधन करताना प्रदेश किंवा वरिष्ठ नेतृत्वाची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक असते.

# मनसेतील बडव्यांमुळेच बाहेर पडलो:भाजप प्रवेशानंतर संतोष धुरींचा बाळा नांदगावकरांवर थेट हल्लाबोल

दिव्य वतन /वृत्तसेवा

मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण तापले असतानाच वरळीतील मनसेचे माजी नगरसेवक संतोष धुरी यांनी भाजपमध्ये प्रवेश करून मोठी खळबळ उडवून दिली आहे. मनसेकडून तिकीट न मिळाल्याने नाराज असलेले संतोष धुरी अखेर भाजपच्या गोटात दाखल झाले. भाजपचे मुंबई अध्यक्ष अमित साटम यांच्या उपस्थितीत झालेल्या या पक्षप्रवेशानंतर धुरी यांनी थेट मनसेच्या अंतर्गत कारभारावर आणि पक्षातील ज्येष्ठ नेत्यांवर गंभीर आरोप केल्याने राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे.भाजपमध्ये प्रवेशानंतर



संतोष धुरी यांनी स्पष्ट केलं की, राज ठाकरे यांच्यावर त्यांची कोणतीही नाराजी नाही. मात्र मनसेच्या आतमध्ये काही "कटकारस्थानी" सक्रिय असल्याचा आरोप त्यांनी केल. आमच्या साहेबांनी एकदा सांगितलं होतं की, विठ्ठलाच्या बाजूला बडवे असतात. राग विठ्ठलावर नसतो, बडव्यांवर असतो. मनसेतही असेच काही बडवे आहेत, अशा शब्दांत त्यांनी पक्षातील अंतर्गत राजकारणावर बोट ठेवलं. बाळा नांदगावकर यांच्यावर थेट आरोप करत त्यांनी, हेच बडवे आमच्यासारख्या कार्यकर्त्यांना झाकण्याचं काम करत असल्याचं म्हटलं.

धुरी यांनी सांगितलं की, पक्षात जास्त बोलणारे, पुढे येणारे चेहरे मुद्दाम बाजूला सारण्याचा प्रयत्न केला जातो. आमच्यामुळे पक्ष चर्चेत राहत होता. त्यामुळेच आम्हाला झाकण्याचा प्रयत्न झाला, असा दावा त्यांनी केला. बाळा नांदगावकर नेहमी युतीची गरज असल्याचं सांगायचे, पण त्या युतीत आपल्या कार्यकर्त्यांवर अन्याय होतोय याकडे त्यांनी कधीच लक्ष दिलं नाही, असा गंभीर आरोपही धुरी यांनी केला. जागावाटपात मनसेच्या निष्ठावंतांवर अन्याय झाल्यामुळेच नाराजी वाढत गेल्याचं त्यांनी स्पष्ट केलं.

# छत्रपतींच्या किल्ल्यांचा जागतिक स्तरावर गौरव अभिमानास्पद - डॉ तेजस गर्गे

## गडावरील माची स्थापत्य म्हणजे सुरक्षितता आणि युद्धकौशल्य मुत्सद्दीनीती

दिव्य वतन /वृत्तसेवा

मुंबई -: महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमी इतिहासाचे प्रतीक असलेले १२ शिवकालीन किल्ले युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांमध्ये (World Heritage Sites) समाविष्ट करण्यात आले आहेत, 'अद्वितीय वैश्विक मूल्य' म्हणून जागतिक स्तरावर गौरव झाला आहे. हे गड-किल्ले म्हणजे शौर्य, सामर्थ्य, संस्कृतीचे आणि स्वराज्याच्या दृढ इच्छाशक्तीचे मूर्तिमंत रूप आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या दूरदृष्टीने उभारलेली ही दुर्गरचना यापुढे जगभर ओळखली जाणार आणि महाराष्ट्राच्या वैभवात भर घालणारी ठरणार आहे. हे केवळ किल्ले नाहीत तर स्वराज्याच्या प्रेरणेची अमर ठिकाणं आहेत. यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस विशेष म्हणजे, सांस्कृतिक कार्य मंत्री अॅड. आशिष शेलार यांनी स्वत: युनेस्कोच्या महानिदेशकांची भेट घेत तांत्रिक सादरीकरण केले होते. त्यांच्यासह अनेक इतिहास अभ्यासक आणि शिवप्रेमींचा यांमध्ये हातभार लागला होता. छत्रपती शिवाजी महाराज वीर होतेच. पण उत्कृष्ट सेनानायक, श्रेष्ठ मुत्सद्दी, थोर राजनीतिज्ञ, धुरंधर पराक्रमी आणि आदर्श राज्यकर्तेही होते. रयतेच्या स्वराज्याची निर्मिती आणि ते टिकविण्यासाठी महाराजांनी हे किल्लेवैभव उभारले. शत्रूला न दिसणारे दरवाजे आणि किल्ल्यांवरील माची स्थापत्य हे मराठा स्थापत्यशास्त्रातील महत्त्वपूर्ण आणि वैशिष्ट्यपूर्ण भाग आहे. माची स्थापत्य म्हणजे गडाच्या सुरक्षिततेचा आणि युद्धकौशल्याचा मुत्सद्दीनीतीने रचलेला भाग आहे. हे माची स्थापत्य जगातील कोणत्याही किल्ल्यात दिसून येत नाही. असे गौरवोद्गार पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालय महाराष्ट्र राज्याचे संचालक डॉ तेजस गर्गे तेजस गर्गे यांनी काढले.श्री शिवाजी ज्ञानपीठ इंटरनॅशनल आणि मराठी साहित्य व कला सेवा यांच्या संयुक्त विद्यमाने दादर येथील धुरू हॉल मध्ये शिवोत्सव - २०२६ कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता याप्रसंगी ते 'जागतिक वारसा स्थळे १२ किल्ले जबाबदारी : सरकारची आणि आपली' या विषयावर आपला विचार मांडत होते. ते पुढे असेही म्हणाले की, एकदा युनेस्कोने जागतिक वारसा स्थळाचा दर्जा दिला की त्या वास्तूचं संवर्धन, नूतनीकरण याचे खूप कडक निकष असतात ते आता आपल्याला पाळावे लागतील, पर्यटकांना गडावर रात्री मुक्काम बंदी करावी लागेल. गड-किल्ल्यांवरील पर्यटकांची वाढलेली गर्दी, उपद्रवी पर्यटकांकडून पायवाटांपासून गडाच्या माथ्यापर्यंत ठिकठिकाणी फेकला जाणारा कचरा, बेकायदा मद्यपान, बुरजांवर, तटबंदीवर उभे राहून 'शौर्य' दाखविण्याच्या प्रयत्नांत पर्यटकांकडून होणारे बांधकामाचे नुकसान अशा समस्यांवर प्रशासनाला यापुढे आक्रमक भूमिका घ्यावी लागणार आहे.







## अर्थविश्व...

### GDP ची घोडदौड सुस्साट, 7.4 टक्के दरानं वाढणार, सांख्यिकी मंत्रालयाचा अंदाज




मंगेश वैशंपायन, नवी दिल्ली: केंद्र सरकारने बुधवारी 2025-26 या आर्थिक वर्षासाठी वर्षासाठी "सकल देशांतर्गत उत्पादनात" ( जीडीपी ) 9 टक्के वाढ होण्याची अपेक्षा किंवा शुभानुमान वर्तविले आहे. सरकारने बुधवारी जाहीर केलेल्या पहिल्या आगाऊ अंदाजात म्हटले आहे की येत्या आर्थिक वर्षात जीडीपी वाढीचा दर 7.4 टक्के असू शकतो, जो मागच्या (2024-25) आर्थिक वर्षात 6.5 टक्के होता.

सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाच्या अंतर्गत राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाने (एसएसओ) जारी केलेल्या आकडेवारीनुसार देशाचे निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न 2025-26 या आर्थिक वर्षात 7.3 टक्के दराने वाढण्याचा अंदाज आहे, जे मागील आर्थिक वर्षात 6.4 टक्के होते. या कालावधीत देशाचा दरडोई जीडीपी 6.5 टक्के दराने वाढण्याची अपेक्षा आहे, जो गेल्या वर्षी 5.5 टक्के होता. या आकडेवारीवरून देशातील आर्थिक घडामोडींमध्ये वाढ झाल्याचा व आणखी वाढ होणार आहे, हा सरकारचा विश्वास स्पष्टपणे दिसून येतो आहे.देशाच्या अर्थ-धोरणात्मक दृष्टिकोनातून हे आकडे अत्यंत महत्त्वाचे आहेत. हे आगाऊ अंदाज 1 फेब्रुवारी रोजी सादर होणाऱ्या आगामी केंद्रीय अर्थसंकल्पाच्या तयारीसाठी वापरले जातात. एकूणच, 7.4 टक्के जीडीपी वाढीचा अंदाज भारतीय अर्थव्यवस्थेच्या मजबूत मूलभूत तत्त्वांचे प्रतिबिंबित करतो. उत्पादन आणि सेवा क्षेत्रे वाढीचे चालक म्हणून उदयास आली आहेत, जी अर्थसंकल्पापूर्वी सरकार आणि बाजारपेठेसाठी उत्साहवर्धक बातमी आहे.

कोणत्या क्षेत्रात किती वाढ?

यात म्हटले आहे की 2025-26 या आर्थिक वर्षात भारताचा नाममात्र जीडीपी वाढीचा दर 8 टक्के असण्याची अपेक्षा आहे. स्थिर किमतींवरील वाढीच्या अंदाजानुसार वित्तीय, रिअल इस्टेट आणि व्यावसायिक सेवा, सार्वजनिक प्रशासन, संरक्षण आणि इतर सेवांच्या स्थिर किमतींत 9.9 टक्के , व्यापार, हॉटेल्स, वाहतूक, दळणवळण आणि प्रसारण सेवांमधील 7.5 टक्के तसेच दुय्यम क्षेत्रांतर्गत येणाऱ्या उत्पादन आणि बांधकामात स्थिर किमतींवर 7 टक्के वाढ होण्याचा अंदाज आहे. कृषी आणि संलग्न क्षेत्रांमध्ये 3.1 टक्के, तर वीज, वायू, पाणीपुरवठा आणि इतर उपयुक्तता सेवांमध्ये 2.1 टक्के वाढ होण्याचाही अंदाज आहे.

### म्युच्युअल फंडातील 'हे' छुपे शुल्क तुमचा नफा खाऊन टाकतात




म्युच्युअल फंडमध्ये गेल्या काही वर्षांत गुंतवणूक करणाऱ्यांची संख्या झपाट्याने वाढली आहे. काही एसआयपीद्वारे गुंतवणूक करतात, तर काही एकरकमी गुंतवणूक करून आपलं भविष्य सुरक्षित करत आहेत. फंड हाऊसेस या गुंतवणुकीवर विविध शुल्क आकारतात, ज्याच्याबद्दल फार कमी लोकांना माहिती असते. या शुल्कांमुळे तुम्हाला अपेक्षित परतावा कमी होऊ शकतो. केवळ फंड हाऊसेसच नव्हे तर सरकार देखील म्युच्युअल फंड गुंतवणुकीवर शुल्क वसूल करतात, ज्याबद्दल बहुतेक गुंतवणूकदारांना माहितीही नसते. हे शुल्क तुमच्या रिटर्नमध्ये लपून राहतात आणि हळूहळू तुमचा नफा कमी करतात. या शुल्कांमध्ये एक्स्पेन्स रेशो, एक्झिट लोड, पोर्टफोलिओ टर्नओव्हर कॉस्ट, कॅश ड्रॅग, नियमित योजनेचे अतिरिक्त कमिशन आणि कर इत्यादींचा समावेश आहे.

म्युच्युअल फंडांमध्ये हा सर्वात मोठा छुपा शुल्क मानला जातो. फंड हाऊसेस निधी व्यवस्थापित करण्यासाठी दरवर्षी गुंतवणूकदारांकडून शुल्क आकारतात ज्यामध्ये फंड व्यवस्थापकाचे शुल्क, मार्केटिंग खर्च आणि प्रशासकीय खर्चाचा समावेश असतो जे थेट वजा केले जात नाहीत पण, एनएव्हीमध्ये समायोजित केले जातात. उदाहरणार्थ, एखादा फंड 12% परतावा देत असेल आणि एक्स्पेन्स रेशो 2% असेल, तर तुम्हाला प्रत्यक्षात फक्त 2% परतावा मिळेल. म्युच्युअल फंडमध्ये गुंतवणूक करणारे बहुतेक गुंतवणूकदार त्यांचे फंड वेळेपूर्वी बंद करतात. हा शुल्क वेळेपूर्वी पैसे काढण्यासाठी, सामान्यतः 1% लागू होतो. एक्झिट लोड शुल्क सहा महिने किंवा एक वर्ष गुंतवणुकीपूर्वी पैसे काढण्यासाठी लागू होतो. गुंतवणूकदार अनेकदा याकडे दुर्लक्ष करतात.

एखादा फंड मॅनेजर जेव्हा वारंवार शेअर्स खरेदी आणि विक्री करतो तेव्हा त्यांना ब्रोकरेज, एसटीटी आणि कर यासारखे शुल्क आकारले जाते, जे तुमच्या परताव्यावर परिणाम करतात. हे शुल्क अनेकदा लपवले जातात आणि त्यामुळे नुकसान होऊ शकते.

फंड हाऊसेस अनेकदा काही पैसे रोख स्वरूपात ठेवतात. बाजार तेजीची उभारी घेतो तेव्हा हे पैसे परतावा देत नाहीत, ज्यामुळे गुंतवणूकदार संधीचा फायदा घेऊ शकत नाहीत. हे देखील एक लपलेले खर्च दर्शवते. ट्रॅकिंग एरर (इंडेक्स फंड किंवा ईटीएफमध्ये) फंड निर्देशांकाचे पूर्णपणे पालन करू शकत नाही, कधीकधी फंड निर्देशांकाच्या हालचालींप्रमाणेच हालचाल करत नाही.



# श्रेयस अय्यर भारतीय संघात खेळण्यासाठी फिट

## सेंटर ऑफ एक्सलन्स मधून डिस्चार्ज, न्यूझीलंडविरुद्ध पहिला एकदिवसीय सामना खेळणार

टीम इंडियाचा उपकर्णधार श्रेयस अय्यर न्यूझीलंडविरुद्धची वनडे मालिका खेळण्यासाठी पूर्णपणे तंदुरुस्त झाला आहे. बुधवारी त्याचे पुनर्वसन पूर्ण झाले आणि त्याला बीसीसीआयच्या सेंटर ऑफ एक्सलन्स मधून डिस्चार्ज देण्यात आला.

मीडिया रिपोर्ट्सनुसार, बीसीसीआयच्या सेंट्रल ऑफ एक्सलन्सचे प्रमुख व्हीव्हीएस लक्ष्मण यांनी मुख्य निवडकर्ता अजित आगरकर यांना ईमेल करून सांगितले की अय्यरचे पुनर्वसन पूर्ण झाले आहे आणि त्याला सोडण्यात आले आहे.

31 वर्षीय अय्यरला न्यूझीलंडविरुद्धच्या वनडे मालिकेसाठी संघात समाविष्ट करण्यात आले होते. पण, त्याला आपला मॅच फिटनेस सिद्ध करायचा होता. अय्यरने एक दिवसापूर्वी विजय हजारे ट्रॉफीमध्ये मुंबईकडून हिमाचल प्रदेशविरुद्ध 82 धावांची खेळी करून आपला फिटनेस सिद्ध केला होता.




अय्यरला 3 जानेवारी रोजी न्यूझीलंडविरुद्धच्या एकदिवसीय संघात समाविष्ट करण्यात आले होते. त्याने गेल्या महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात नियमित जिम आणि फिटनेस रूटीन सुरू केले होते. त्यावेळी त्याचे सर्व अहवाल सामान्य आले होते.

न्यूझीलंडविरुद्ध पहिला वनडे खेळू शकतो अय्यर

श्रेयस अय्यर न्यूझीलंडविरुद्ध पहिला वनडे सामना खेळू शकतो. हा सामना बडोद्यात 11 जानेवारी रोजी खेळवला जाणार आहे. त्यानंतर 14 ला राजकोट आणि 18 ला इंदूरमध्ये वनडे सामने खेळले जातील. अय्यर टी-20 मालिकेसाठी भारतीय संघाचा भाग नाही.

श्रेयस गेल्या वर्षी ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर जखमी झाला होता

अय्यर 25 ऑक्टोबर रोजी




ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या तिसऱ्या वनडेमध्ये जखमी झाला होता. त्याला सिडनी येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्याला प्लीहाची दुखापत झाली होती, ज्यातून सावरण्यासाठी त्याला 3 महिन्यांचा कालावधी लागला.

### ॲशेसमध्ये पहिल्यांदाच एका डावात सात 50+ पार्टनरशिप:ऑस्ट्रेलिया 567 धावांवर सर्वबाद

#### चौथ्या दिवशी इंग्लंड 302/8, बेथेलचे पहिले कसोटी शतक

सिडनी क्रिकेट ग्राउंडवर खेळल्या जात असलेल्या पाचव्या आणि शेवटच्या कसोटीच्या चौथ्या दिवशी बुधवारी ऑस्ट्रेलियाचा संघ पहिल्या डावात 567 धावांवर सर्वबाद झाला. ऑस्ट्रेलियाने पहिल्या डावाच्या आधारावर 183 धावांची आघाडी घेतली. यापूर्वी इंग्लंडचा संघ आपल्या पहिल्या डावात 384 धावांवर गारद झाला होता.

दिवसाचा खेळ संपेपर्यंत इंग्लंडने दुसऱ्या डावात 8 गडी गमावून 302 धावा केल्या आहेत आणि एकूण आघाडी 119 धावांची झाली आहे. जॅकब बेथेल 142 धावांवर नाबाद परतला. सामन्याचा पाचवा आणि शेवटचा दिवस गुरुवारी सकाळी 5 वाजता सुरू होईल.

ऑस्ट्रेलियाच्या पहिल्या डावा दरम्यान सात 50 पेक्षा जास्त धावांच्या भागीदारी झाल्या, जे ॲशेसच्या इतिहासात पहिल्यांदाच पाहायला मिळाले.

स्मिथने १३८ धावा केल्या

चौथ्या दिवसाचा खेळ सुरू झाल्यावर ऑस्ट्रेलियाचा स्कोर ५१८/७ होता. स्टीव्ह स्मिथ (१२९) आणि ब्यू वेबस्टर (४२) यांनी डाव पुढे नेला. यजमान संघाने स्कोअरमध्ये ४९ धावांची भर घालून पहिल्या डावात ५६७ धावांवर सर्वबाद झाला. त्यामुळे त्यांना १८३ धावांची आघाडी मिळाली. ऑस्ट्रेलियासाठी कर्णधार स्टीव्ह स्मिथने २२० चेंडूंमध्ये १३८ धावा केल्या, ज्यात १६ चौकार आणि एक षटकार समाविष्ट होता. ब्यू वेबस्टरने ८७ चेंडूंमध्ये ७१ धावा केल्या, ज्यात सात चौकार समाविष्ट होते. ट्रॅव्हिस हेडने सर्वाधिक १६३ धावा केल्या.ऑस्ट्रेलियाने आपल्या डावात सात वेळा ५० किंवा त्याहून अधिक धावांच्या भागीदारी केल्या, जे ॲशेसच्या इतिहासात पहिल्यांदाच घडले आहे. यापूर्वी हा विक्रम केवळ एकदाच २००७ मध्ये भारताने द ओव्हल कसोटीत केला होता.

बेथेल 142 धावा करून नाबाद परतले

इंग्लंडची सुरुवात खराब झाली आणि जॅक क्रॉली पहिल्याच षटकात बाद झाले.




# SA20 मध्ये MI केप टाऊनचा पहिला विजय

## जॉबर्ग सुपर किंग्जला डकवर्थ-लुइसने 4 विकेट्सने हरवले पूरनने 15 चेंडूंत 33 धावा केल्या

वैभव सूर्यवंशीने दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या तिसऱ्या अंडर-19 एकदिवसीय सामन्यात शतक झळकावले आहे. बेनोनी येथील विलोमूर पार्क स्टेडियमवर खेळल्या जात असलेल्या सामन्यात त्याने 63 चेंडूंमध्ये शतक पूर्ण केले.

14 वर्षीय वैभवने 74 चेंडूंमध्ये 127 धावांची खेळी केली. यादरम्यान त्याने 10 षटकार आणि 9 चौकार मारले. वैभवने आरोन जॉर्जसोबत 227 धावांची सलामीची भागीदारी केली.

वैभव सूर्यवंशी या मालिकेत कर्णधारपदही भूषवत आहे. कर्णधार म्हणून भारतासाठी हे त्याचे पहिले शतक आहे. त्याच्याशिवाय, आरोन जॉर्जने 118 धावांची खेळी केली. सध्या, भारतीय संघाने 42 षटकांत 5 गडी गमावून 321 धावा केल्या आहेत. आरएस अम्ब्रिश आणि कनिष्क चौहान नाबाद आहेत.

वैभवच्या 3 मोठ्या खेळी

सूर्यवंशी आता विराटपेक्षा फक्त 5 धावांनी मागे

वैभव सूर्यवंशी अंडर-19 एकदिवसीय क्रिकेटमध्ये भारतासाठी सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजांच्या यादीत विराट कोहलीपेक्षा फक्त 5 धावांनी मागे आहे. त्याने 18 सामन्यांमध्ये 973 धावा केल्या आहेत. तर कोहलीने 28 सामन्यांमध्ये 46.57 च्या सरासरीने 978 धावा केल्या आहेत. आतापर्यंत वैभवची सरासरी (54.05) विराटपेक्षा चांगली आहे. या यादीत सर्वाधिक धावा विजय झोलने केल्या आहेत. विजयच्या नावावर 36 सामन्यांमध्ये 1404 धावा आहेत. यशस्वी जयस्वाल (1386 धावा) दुसऱ्या आणि तन्मय श्रीवास्तव (1316 धावा) तिसऱ्या क्रमांकावर आहे. उन्मुक्त चंद, सरफराज खान आणि शुभमन गिल देखील या यादीत वैभवपेक्षा वर आहेत.

भारतीय संघात 2 बदल

भारतीय संघाने या सामन्यात त्यांच्या प्लेइंग 11 मध्ये दोन बदल केले आहेत. या सामन्यात दीपेश देवेंद्रन आणि खिलन पटेल यांना विश्रांती देण्यात आली आहे. त्यांच्या जागी उद्धव मोहन आणि हेनिल पटेल यांना प्लेइंग 11 मध्ये स्थान मिळाले आहे.

दुसऱ्या वनडेत 19 चेंडूंवर अर्धशतक ठोकले होते

यापूर्वी वैभवने सोमवारी दक्षिण आफ्रिकेच्या अंडर-19 संघाविरुद्ध 19 चेंडूंवर अर्धशतक केले होते. त्याने 24 चेंडूंमध्ये 68 धावांची खेळी केली. या खेळीत त्याने 10 षटकार आणि एक चौकारही मारला होता. अशा प्रकारे त्याने 68 पैकी 64 धावा चौकार-षटकारांनी केल्या होत्या.

भारत मालिकेत 2-0 ने आघाडीवर

भारत तीन सामन्यांच्या मालिकेत 2-0 ने आघाडीवर आहे. संघाने पहिला सामना 25 धावांनी आणि दुसरा सामना 8 गडी राखून जिंकला होता.

दोन्ही संघांचे प्लेइंग 11

भारत: आरोन जॉर्ज, वैभव सूर्यवंशी (कर्णधार), वेदांत त्रिवेदी, अभिज्ञान कुंडू (यष्टीरक्षक), हरवंश पंगालिया, आरएस अंबरीश, कनिष्क चौहान, मोहम्मद एनान, खिलान पटेल, उधव मोहन, हेनिल पटेल.

दक्षिण आफ्रिका: जोरिच वान शल्कविक, अदनान लागाडियन, मुहम्मद बुलबुलिया (कर्णधार), जेसन राउल्स, डॅनियल बोसमॅन, पॉल जेम्स, लेथाबो फाह्लामोहलाका (यष्टीरक्षक), कॉर्न बोथा, मायकल क्रुइस्कॅम्प, जे जे बैसन, एनटांडो सोनी.



# वैभव सूर्यवंशीने 63 चेंडूंत केले शतक:आरोन जॉर्जनेही शतक झळकावले, दोघांत 227 धावांची भागीदारी; भारत 321/5

वैभव सूर्यवंशीने दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या तिसऱ्या अंडर-19 एकदिवसीय सामन्यात शतक झळकावले आहे. बेनोनी येथील विलोमूर पार्क स्टेडियमवर खेळल्या जात असलेल्या सामन्यात त्याने 63 चेंडूंमध्ये शतक पूर्ण केले.

14 वर्षीय वैभवने 74 चेंडूंमध्ये 127 धावांची खेळी केली. यादरम्यान त्याने 10 षटकार आणि 9 चौकार मारले. वैभवने आरोन जॉर्जसोबत 227 धावांची सलामीची भागीदारी केली.

वैभव सूर्यवंशी या मालिकेत कर्णधारपदही भूषवत आहे. कर्णधार म्हणून भारतासाठी हे त्याचे पहिले शतक आहे. त्याच्याशिवाय, आरोन जॉर्जने 118 धावांची खेळी केली. सध्या, भारतीय संघाने 42 षटकांत 5 गडी गमावून 321 धावा केल्या आहेत. आरएस अम्ब्रिश आणि कनिष्क चौहान नाबाद आहेत.

वैभवच्या 3 मोठ्या खेळी

सूर्यवंशी आता विराटपेक्षा फक्त 5 धावांनी मागे

वैभव सूर्यवंशी अंडर-19 एकदिवसीय क्रिकेटमध्ये भारतासाठी सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजांच्या यादीत विराट कोहलीपेक्षा फक्त 5 धावांनी मागे आहे. त्याने 18 सामन्यांमध्ये 973 धावा केल्या आहेत. तर कोहलीने 28 सामन्यांमध्ये 46.57 च्या सरासरीने 978 धावा केल्या आहेत. आतापर्यंत वैभवची सरासरी (54.05) विराटपेक्षा चांगली आहे. या यादीत सर्वाधिक धावा विजय झोलने केल्या आहेत. विजयच्या नावावर 36 सामन्यांमध्ये 1404 धावा आहेत. यशस्वी जयस्वाल (1386 धावा) दुसऱ्या आणि तन्मय श्रीवास्तव (1316 धावा) तिसऱ्या क्रमांकावर आहे. उन्मुक्त चंद, सरफराज खान आणि शुभमन गिल देखील या यादीत वैभवपेक्षा वर आहेत.

भारतीय संघात 2 बदल

भारतीय संघाने या सामन्यात त्यांच्या प्लेइंग 11 मध्ये दोन बदल केले आहेत. या सामन्यात दीपेश देवेंद्रन आणि खिलन पटेल यांना विश्रांती देण्यात आली आहे. त्यांच्या जागी उद्धव मोहन आणि हेनिल पटेल यांना प्लेइंग 11 मध्ये स्थान मिळाले आहे.

दुसऱ्या वनडेत 19 चेंडूंवर अर्धशतक ठोकले होते

यापूर्वी वैभवने सोमवारी दक्षिण आफ्रिकेच्या अंडर-19 संघाविरुद्ध 19 चेंडूंवर अर्धशतक केले होते. त्याने 24 चेंडूंमध्ये 68 धावांची खेळी केली. या खेळीत त्याने 10 षटकार आणि एक चौकारही मारला होता. अशा प्रकारे




त्याने 68 पैकी 64 धावा चौकार-षटकारांनी केल्या होत्या.

भारत मालिकेत 2-0 ने आघाडीवर

भारत तीन सामन्यांच्या मालिकेत 2-0 ने आघाडीवर आहे. संघाने पहिला सामना 25 धावांनी आणि दुसरा सामना 8 गडी राखून जिंकला होता.

दोन्ही संघांचे प्लेइंग 11

भारत: आरोन जॉर्ज, वैभव सूर्यवंशी (कर्णधार), वेदांत त्रिवेदी, अभिज्ञान कुंडू (यष्टीरक्षक), हरवंश पंगालिया, आरएस अंबरीश, कनिष्क चौहान, मोहम्मद एनान, खिलान पटेल, उधव मोहन, हेनिल पटेल.





## महत्त्वाचे...

### जो पेजेला देईल त्याच्या शेजेवर अशी भाजपची भूमिका



मुंबई- महाराष्ट्रात अर्धी काँग्रेस भाजपात सहभागी करुन घेतली. उर्वरित ठिकाणी एमआयएम बरोबर युती केली. भाजपला कोणीही चालते. महाराष्ट्रभर भाजप-एमआयएमची छुपी युती आहे. जो पेजेला देईल त्याच्या शेजेवर चढायला भाजप तयार आहे. अशी टीका राऊत यांनी केली. तसेच एमआयएमशी युती करताना ते आता हिरवे झाले नाहीत का? असा बोचरा सवालही राऊत यांनी भाजपला केला आहे. मिराभाईंदर आणि अकोटमध्ये भाजपने एमआयएमसोबत युती केली आहे. तर अंबरनाथ नगरपरिषदमध्ये काँग्रससोबत हातमिळवणी करत सत्ता स्थापन केली. यावरून संजय राऊत यांनी भारतीय जनता पक्षावर जिव्हारी लागणाऱ्या शब्दांत टीका केली आहे. तसेच अजित पवार सावरकरांना मानत नाहीत, तर मग त्यांना सरकारमध्ये कशाला ठेवता? त्यांना सरकारमधून दूर करा, असे आव्हानही संजय राऊत यांनी भाजपला दिले.

### फडणवीसांनी करप्शनवर काही बोलूच नये:राज ठाकरेंचा आरोप

मुंबई-महाराष्ट्राच्या राजकारणात ठाकरे नावाचा दरारा आजही तितकाच प्रभावी असल्याचं पुन्हा एकदा अधोरेखित झालं आहे. शिवसेना (UBT) आणि मनसे यांच्यातील युतीनंतर उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या पहिल्यावहिल्या संयुक्त मुलाखतीचा टीझर समोर आला असून, या एका व्हिडीओनं संपूर्ण राज्याचं लक्ष वेधून घेतलं आहे. शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत आणि प्रसिद्ध सिनेनिर्माते, दिग्दर्शक व अभिनेता महेश मांजरेकर यांनी घेतलेली ही मुलाखत राजकीय दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. कारण या मुलाखतीत ठाकरे बंधूंनी सत्ताधाऱ्यांवर, विशेषतः भाजपवर केलेला थेट आणि आक्रमक हल्ला पाहता आगामी राजकारणाची दिशा स्पष्ट करणारी ही चर्चा ठरण्याची शक्यता आहे.

या मुलाखतीच्या टीझरमध्ये उद्धव ठाकरे यांनी सत्तेच्या मानसिकतेवर जोरदार प्रहार केला आहे. राज्यकर्त्याचे प्रेम हे राज्यावर असले पाहिजे, सत्तेवर असता कामा नये, अशा शब्दांत त्यांनी सत्ताधाऱ्यांना थेट संदेश दिला. या एका वाक्यातूनच सध्याच्या सत्तास्थापनेवर त्यांची नाराजी स्पष्टपणे दिसून येते. सत्ता टिकवण्यासाठी राज्याच्या हिताकडे दुर्लक्ष केलं जात असल्याचा आरोप अप्रत्यक्षपणे त्यांनी केला आहे. ठाकरे बंधू एकत्र आल्यानंतर त्यांच्या वक्तव्यांना वेगळंच राजकीय वजन प्राप्त झालं असून, हा टीझर म्हणजे संपूर्ण मुलाखतीचा केवळ एक झलक असल्याचं स्पष्ट होतं.

दुसरीकडे, राज ठाकरे यांनीही या मुलाखतीत तितक्याच आक्रमक शैलीत भाजपवर निशाणा साधला आहे. विशेषतः भ्रष्टाचाराच्या मुद्द्यावर त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर थेट घणाघात केला. फडणवीसांनी करप्शनवर काही बोलूच नये, अशा शब्दांत त्यांनी सत्ताधाऱ्यांच्या नैतिक अधिकारावरच प्रश्नचिन्ह उपस्थित केलं आहे. फडणवीसांनी यापूर्वी ठाकरे युतीला करप्शन आणि कन्फ्यूजनची युती असं संबोधलं होतं.

# भाजप आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादीत वाद!

## जयंत पाटलांनी सांगितले पडद्यामागील राजकारण; दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्यावरही केले भाष्य

दिव्य वतन /वृत्तसेवा

मुंबई-राज्यातील आगामी महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण चांगलेच तापले असून, सत्ताधारी महायुतीमधील भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट यांच्यातच कलगीतुरा रंगताना दिसत आहे. विशेष म्हणजे, सत्ताधारी पक्षातील हे दोन मित्रपक्षच एकमेकांवर जोरदार टीका करत असल्याने, निवडणुकीच्या रिंगणात महाविकास आघाडी आहे की नाही, असा प्रश्न उपस्थित होत आहे. सध्याचे चित्र पाहता ही निवडणूक विरोधकांविरुद्ध नसून सत्ताधाऱ्यांमध्येच अंतर्गत सुरू असल्याचे भासत आहे.

या वाढत्या राजकीय संघर्षावर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते जयंत पाटील यांनी भाष्य करत पडद्यामागचे राजकारण उघड केले आहे. अजित पवार आणि भाजप नेत्यांमधील ही टीका-टीपण्णी म्हणजे केवळ दाखवण्यापुरती आहे की त्यामागे काही वेगळी रणनीती आहे, यावर त्यांनी प्रकाश टाकला. तसेच, अजित पवारांकडून वारंवार 'पवार कुटुंब' पुन्हा एकत्र येण्याबाबत जी विधाने केली जात आहेत, त्यावरूनही पाटील यांनी आपली भूमिका स्पष्ट करत संभ्रम दूर करण्याचा प्रयत्न केला आहे.

सत्तेत असूनदेखील दोन पक्षातील नेते एकमेकांविरोधात टीका करतात, अगदी जोरात बोलत आहेत. भाजप नेते आणि अजित पवार यांच्यामध्ये होत असलेली वक्तव्य पाहता विरोधकांना स्पेसच मिळू नये, यासाठी हा प्रयत्न असावा, असे जयंत पाटील म्हणाले. परंतु, अजित पवार या षड्यंत्रयात सहभागी होणार नाहीत असे मला वाटते, असेही पाटील म्हणाले.

दोन राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष पुन्हा एकत्र येण्याबाबत राजकीय वर्तुळात सध्या जोरदार चर्चा सुरू असून, अजित पवार यांनीही आपल्या भाषणांतून तसे संकेत दिले आहेत. मात्र, या संदर्भात राष्ट्रवादीतील वरिष्ठ नेत्यांमध्ये अद्याप संभ्रम असल्याचे दिसून येते. यावर भाष्य करताना जयंत पाटील यांनी सावध भूमिका घेतली असून, राज्यस्तरावर अशा कोणत्याही हालचाली किंवा चर्चा सुरू असल्याची मला कल्पना नाही, असे म्हणत या विषयावर अधिक बोलणे टाळले.

लातूरमधील प्रचारसभेत भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी विलासराव देशमुखांच्या आठवणी पुसल्या जातील, असे विधान केल्यावर जयंत पाटील यांनी त्यावर कडक शब्दांत प्रत्युत्तर दिले आहे. विलासरावांचे नाव विसरायला लावण्याचे धाडस जर भाजपचे नेते जाहीरपणे करत असतील, तर त्यांच्यात खासगीत कोणत्या दर्जाची चर्चा होत असेल याचा अंदाज येतो, अशी टीका पाटील यांनी केली. तसेच, लोकनेते विलासराव देशमुख यांच्याबद्दल केलेले असे वादग्रस्त वक्तव्य लातूरची जनता कधीही मान्य करणार नाही, असे ठाम मतही त्यांनी व्यक्त केले.



## मराठी माणसाच्या भल्यासाठी मुंबईत ठाकरेच विजयी व्हावेत:राजू शेट्टींचा ठाकरे बंधूंना पाठिंबा

दिव्य वतन /वृत्तसेवा

मुंबई-मराठी माणसाच्या भल्यासाठी मुंबईत ठाकरेच विजयी व्हावेत, आमची त्यांना सहानुभूती असल्याचे विधान शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी केले आहे.

तसेच महाराष्ट्राच्या हक्काचे किती प्रकल्प गुजरातला पाठवले याची माहिती घ्यावी, म्हणजे मुख्यमंत्र्यांचे मराठीवरील प्रेम दिसून येईल, असा टोलाही शेट्टी यांनी लगावला आहे. धाराशिव येथे शक्तिपीठ महामार्गाच्या विरोधात झालेल्या आंदोलनानंतर राजू शेट्टी माध्यमांशी बोलत होते.



आगामी महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने राजकीय पक्षांचे प्रचार सुरू झाले आहेत. तसेच राजू शेट्टी यांनी महाराष्ट्रातील इतर ठिकाणी काँग्रेसला पाठिंबा दिला असला तरी मुंबईत मात्र त्यांनी ठाकरेंना पाठिंबा दिल्याचे पाहायला मिळत आहे.

आमचे वैचारिक मतभेद असले तरीही मुंबईत मराठी माणसाच्या भल्यासाठी ठाकरे बंधूच विजयी व्हावेत, असे राजू शेट्टी म्हणाले.

## अजित पवार हेच महाराष्ट्राचे आका: स्वत:चा भ्रष्टाचार लपवण्यासाठी भाजपसोबत आले, आमदार महेश लांडगेंचा हल्लाबोल

दिव्य वतन /वृत्तसेवा

मुंबई-अजित पवार हेच महाराष्ट्राचे आका असून आधी त्यांनी स्वतःच्या मुलाचा पराक्रम पाहावा आणि नंतर आमच्यावर टीका करावी, असा टोला भाजपचे आमदार महेश लांडगे यांनी लगावला आहे. तसेच अजित पवार हे स्वतःचा भ्रष्टाचार लपवण्यासाठी भाजपसोबत आले आहेत, त्यांनी आम्हाला शिकवू नये, अशी खरमरीत टीका लांडगे यांनी केली आहे. अजित पवारांनी केलेल्या भ्रष्टाचाराच्या आरोपांवर लांडगे यांनी एका वृत्तवाहिनीशी बोलताना उत्तर दिले आहे.



आमदार महेश लांडगे म्हणाले, आधी स्वतःच्या लोकांचे पराक्रम पाहा आणि ते स्वतः आका आहेत, हे त्यांनी जाहीर करावे. ते मला पिंपरी चिंचवडचा आका म्हणत आहेत, मुळात अजित पवार हेच महाराष्ट्राचे आका आहेत. दरम्यान, पिंपरी चिंचवड महापालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महेश लांडगे आणि अजित पवार यांच्यात चांगलीच जुंपली असल्याचे पाहायला मिळत आहे. पुढे बोलताना महेश लांडगे म्हणाले, सध्या अजित पवारांचा अहंकार बोलत आहे, ते नैराश्यात आहेत. स्वतःचा भ्रष्टाचार लपवण्यासाठी भाजपमध्ये आलेल्या अजित पवारांनी आमच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप करू नयेत. तसेच आमच्यावरील भ्रष्टाचाराचे आरोप सिद्ध करायचे असतील तर मी, पालिका प्रशासन आणि अजितदादांनी सामोरासमोर बसावे, मग सर्व उत्तर मिळतील,

## अंबरनाथमध्ये भाजप-काँग्रेस एकत्र?:स्वत:हून समर्थन दिले ही युती नाही; फडणवीसांच्या इशाऱ्यानंतर भाजप नेत्याचे स्पष्टीकरण

दिव्य वतन /वृत्तसेवा

मुंबई-आगामी महानगरपालिकेच्या पार्श्वभूमीवर राज्यात भाजपचे दोन नगरपालिकांमध्ये थेट काँग्रेस आणि एमआयएमसोबत युती केल्याने भुवया उंचावल्या आहेत. यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अशी कोणतीही युती होणार नाही आणि जर कोणी केली असेल तर कारवाई होईल, असा इशारा दिला. त्यानंतर आता अंबरनाथमधील भाजप नेते व माजी आमदार नरेंद्र पवार यांनी स्पष्टीकरण दिले आहे.

अंबरनाथ-बदलापूरमध्ये भाजप आणि शिवसेना शिंदे गटाचे स्वतंत्र निवडणूक लढवली आहे. त्यात सत्ता भाजपच्या हाती आली. अंबरनाथ नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा तेजश्री करंजुळे सुशिक्षित असून त्यांना काँग्रेसने समर्थन दिले आहे, ही युती नाही, असे स्पष्टीकरण नरेंद्र पवार यांनी दिले आहे.

नरेंद्र पवार म्हणाले, काँग्रेस आणि इतर घटकांनी भाजपाला पाठिंबा दिला आहे, अंबरनाथमध्ये विकास होण्याच्या दृष्टिकोनातून विकासाची काम जी रखडले आहेत त्याला गती देण्यासाठी त्यांनी भाजपला समर्थन दिल्याचा हा प्रकार आहे, ही युती झालेली नाही. काँग्रेसकडे आम्ही पाठिंबा मागितला नाही, त्यांनी आम्हाला समर्थन दिलेले आहे. आमच्या सोबत या, आम्हाला मदत करा अशी कुठलीही मागणी भाजपने केलेली नाही.

अंबरनाथमध्ये आधीची सत्ता शिवसेनेची होती. शिवसेनेच्या स्थानिक नेत्यांवर येथील जनता नाराज होती. त्या नाराजीतून नवीन पर्याय शोधावा म्हणून भाजप हा चांगला सक्षम पर्याय अंबरनाथच्या जनतेने निवडला, असेही नरेंद्र पवार यांनी म्हटले. तसेच भाजपने शिवसेनेला विरोधी पक्ष केला असे म्हणता येणार नाही. ज्यांनी भाजपला समर्थन दिले ते विकासासाठी दिले आहे, तेही विना अटी-शर्तीवर हे समर्थन आहे, असे पवार म्हणाले.

पुढे बोलताना नरेंद्र पवार म्हणाले, लोकप्रतिनिधी आणि पक्षाची बांधिलकी ही जनतेशी असते, विकासाच्या कामाशी असते, आमचे जे विरोधक आहेत त्यांना जर वाटत असेल भाजपला समर्थन दिल्याने विकास होणार आहे, तर त्यात गैर काय आहे. काँग्रेसला कुठलेही पद देत नसून त्यांना सत्तेतला वाटा देण्यात येणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.



अकोल्यात भाजप-एमआयएम युतीवर बोलताना नरेंद्र पवार म्हणाले, अकोला जिल्ह्यात जी युती झाली होती, त्या संदर्भात मला माहित नाही. तसेच वरिष्ठ पातळीवर अशा युतींना कोणी परवानगी देईल असे मला वाटत नाही. तसेच पक्षश्रेष्ठींचा जो आदेश असेल तो आकोट-अंबरनाथसाठी लागू असणार, मुख्यमंत्री आणि पक्ष नेतृत्वांचा निर्णय आम्हाला बंधनकारक आहे.

## अकोटमधील भाजप-MIM युती तुटली

दिव्य वतन /वृत्तसेवा

मुंबई-सत्तेसाठी एमआयएमशी हातमिळवणी करणे अकोटमधील भाजप नेत्यांना चांगलेच महागात पडले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ही युती 'तत्वशून्य' असल्याचे सांगत कडक कारवाईचे संकेत दिल्यानंतर, अवघ्या काही तासांतच अकोटमधील भाजप-एमआयएम युती तुटली आहे. या प्रकरणाची गंभीर दखल घेत भाजप नेतृत्व आता स्थानिक आमदार आणि पदाधिकाऱ्यांना 'कारण दाखवा' नोटीस बजावणार आहे.अकोटमध्ये एमआयएमला सोबत घेऊन




'अकोट विकास मंच' स्थापन करण्याच्या निर्णयात आघाडीवर असलेले भाजपचे आमदार प्रकाश भारसाकळे आता पक्षाच्या रडारवर आले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार आमदार प्रकाश भारसाकळे, भाजपचे अकोट शहराध्यक्ष, निवडणूक प्रभारी, गटनेते आणि प्रमुख पदाधिकाऱ्यांना पक्षाकडून 'कारण दाखवा' नोटीस पाठवली जाणार आहे.

## पुण्यात नागरी समस्या आ वासून उभ्या:रॅपच्या माध्यमातून प्रशासनावर अजित पवारांची टीका; एक अलार्म पाच काम कॅम्पेन सुरु



दिव्य वतन /वृत्तसेवा

मुंबई-अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील नागरी समस्यांवर बोट ठेवण्यासाठी 'एक अलार्म, पाच कामे' हे विशेष कॅम्पेन सुरू केले आहे. या मोहिमेअंतर्गत एका रॅप साँगच्या माध्यमातून शहरातील खड्डे, कचरा, वाढती गुन्हेगारी, वाहतूक कोंडी आणि पाणीटंचाई या पाच प्रमुख मुद्द्यांवरून प्रशासनावर जोरदार टीका करण्यात आली आहे. महापालिकेत मोजक्याच कंत्राटदारांना टेंडर दिले जात असल्यामुळे कामाचा दर्जा खालावला असून, त्याचा थेट फटका सामान्य नागरिकांना सोसावा लागत असल्याचा आरोपही या मोहिमेद्वारे करण्यात आला आहे.

या संदर्भात स्पष्टीकरण देताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नमूद केले की, हे कॅम्पेन केवळ पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कारभारापुरते मर्यादित आहे. या रॅप साँगचा केंद्र किंवा राज्य सरकारच्या कामकाजाशी कोणताही संबंध नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. स्थानिक पातळीवर रखडलेली विकासकामे आणि प्रशासकीय त्रुटींकडे लक्ष वेधणे हाच यामागचा मुख्य उद्देश असून, महापालिकेतील सत्ताधाऱ्यांच्या कारभारावर या माध्यमातून 'अलार्म' वाजवून टीका करण्यात आली आहे.

अजित पवार म्हणाले, पुणे आणि पिंपरीमधील काम समोर आणण्यासाठी, दोन्ही महापालिका अपयशी ठरल्या आहेत. लोकांचे आणि प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी हे गाण लाँच केले आहे. नागरिकांना आवाहन आहे की माझा जो प्रशासनातील अनुभव आहे, मी काम करतो. तुमचे सगळे प्रश्न सोडवून दाखवू. एक अलार्म लावू आणि लक्ष वेधून घेऊ. लोकांच्या अडचणी सुटल्या पाहिजेत. तिथल्या लोकांना अलार्म कळला पाहिजे. समस्या सोडवल्या गेल्या पाहिजेत. महत्त्वाच्या पाच गोष्टी दूर केल्याशिवाय नागरिकांना जीवन जगता येणार नाही, असे पवार म्हणाले.

पुणे आणि पिंपरी मध्ये नागरी समस्या खूप आहेत. अनेक प्रभागात रोड शो केला आहे. त्या त्या प्रभागातली उमेदवार सोबत होते. नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे. आज त्याचे रुपांतर मतदानामध्ये झाले पाहिजे, असे आवाहन अजित पवारांनी केले आहे. पुणे आणि पिंपरीमध्ये नागरी समस्या आ वासून उभ्या आहेत. कचरा, आरोग्य सेवा, वाहतुकीची कोंडी, रस्त्यावर खड्डेच खड्डे आहे, पाण्याची अडचण आहे यावर काम करायचे आहे. टँकर माफियाची गँग आहे. कचरा वेळेवर उचलला जात नाही. रोज अनुभव आपल्या नागरिकांना येत आहे. कागदावर अनेक योजना आहेत. पुणे शहरातले नागरिक भरडले जात आहेत. चुकीचे पाणीवाटप केले जात आहे, कचरा व्यवस्थापन नीट नाही, असे पवार म्हणाले.

पुढे बोलताना अजित पवार म्हणाले, सगळ्या गोष्टी कोलमडल्या आहेत. 12350 लोक पुणे स्वच्छ करण्यासाठी काम करतात. मात्र रस्त्यावर कचरा दिसत आहे. पुण्यात हवेची गुणवत्ता ढासळत आहे. प्रदूषित श्वास आपले लोक घेत आहेत. कुत्र्यांची नसंबंदी केली मात्र 20 हजार कुत्री लोकांना चावली आहेत. या सगळ्या समस्येतून पुणेकरांना बाहेर काढण्यासाठी आणि पुणे महापालिकेची बिघडलेली अवस्था दुरुस्त करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि सहकारी पक्ष एक अलार्म 5 काम या संकल्पनेवर हा उपक्रम सूर करत आहोत, अशी माहिती पवारांनी दिली आहे.

काम करुन पाठवण्याची आणि थांबलेली कामे सुरू करण्याची ताकद आमच्यात आहेत. एक अलार्म पाच कामे हा जाहीरनामा जाहीर करणार आहोत. 10 तारखेला जाहीरनामा तुमच्यासमोर आणू असे अजित पवार म्हणाले. नुसत्या उणिवा दाखवणार नाही तर आम्ही काय करू हे देखील सांगू. पुणेकरांना विश्वास देणार आहे. काही कामे करू हे देखील सांगू. पालिकेत मोजक्याच लोकांना टेंडर दिले जाते त्याचा फटका नागरिकांना बसतो असे अजित पवार म्हणाले.